गुरूवार, २१ मार्च २०२४
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - २०८
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) THURSDAY 21 MARCH 2024 adhunikkesari.com ●YEAR-03 ●ISSUE-208 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-05

## चर्चेतील बातमी

# बहीण-भावानेच बांधली लग्नगाठ

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** उत्तर प्रदेशमध्ये मुख्यमंत्री सामूहिक विवाह योजनेच्या माध्यमातून नवविवाहित जोडप्यांना आर्थिक मदतीचा लाभ दिला जातो. या योजनेत अनेक गैरव्यवहार होतात. त्यातला एक प्रकार समोर आल्यानंतर अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला. सामूहिक विवाह सोहळ्यात जोडप्याना अनुदान आणि गृहपयोगी वस्तूंचे वाटप केले जाते. यात गैरव्यवहार करण्यासाठी अनेक एजंट सक्रिय आहेत. या एजंट्सनी चक्क बहिण-भावाचेच लग्न लावून दिल्यामुळे खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे यातील बहिणीचे आधीच लग्न झालेले होते. तरीही तिच्याशी भावाची लग्नगाठ बांधून गैरव्यवाहर केला गेला. उत्तर प्रदेशमध्ये आर्थिक मागास घटकातील लोकांना मदत करण्यासाठी मुख्यमंत्री सामूहिक विवाह योजना सुरू करण्यात आली. नुकतेच महाराजगंज या जिल्ह्यातील एक घटना समोर आली आहे. मध्यस्थी करणाऱ्या एका एजंटने योजनेचे अनुदान लाटण्यासाठी बहिण-भावालाच बोहल्यावर चढवलं. यानंतर या दोघांना ३५ हजार रुपयांचे अनुदान आणि गृहप्रयोगी वस्तू मिळाल्या. ५ मार्च रोजी महाराजगंज जिल्ह्यातील लखीमपूर मंडळात ३८ जोडप्यांचे सामूहिक विवाह सोहळ्याच्या योजनेअंतर्गत लग्न लावून देण्यात आले होते.

# मनसेचा प्रस्ताव भाजपने फेटाळला

## आता राज ठाकरेंच्या निर्णयाकडे सर्वांचे लक्ष

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : मुंबई : महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने लोकसभेसाठी दोन जागांचा प्रस्ताव महायुतीसमोर ठेवला होता. पण दोन जागा देणे शक्य नाही, केवळ एकच जागा देणे शक्य असल्याचे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी भेटीदरम्यान राज ठाकरेंना स्पष्ट सांगितले. आता मनसे अध्यक्ष अमित शहांसोबतच्या बैठकीवर काय निर्णय घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.**



मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी दिल्लीत भाजप नेते अमित शहांची भेट घेतली आणि मनसेच्या महायुतीसोबत जाण्याचे जवळपास निश्चितच झाल्याचे बोलले जात आहे. फक्त घोडे अडले ते जागावाटपावरुन. दिल्लीतील बैठकीत मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यासह पुत्र अमित ठाकरेही उपस्थित होते. तर अमित शाह यांच्यासह भाजप अध्यक्ष जे पी नड्डा, राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणीस, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित होते.

राज ठाकरेंनी दोन जागा दक्षिण मुंबई आणि दक्षिण मध्य मुंबई मनसेला देण्यात यावी असा प्रस्ताव ठेवला होता. त्यावर एक जागा निश्चित पण दुसरी जागा देणे कठीण असल्याचं अमित शाहांनी सांगितले. तसेच, राज ठाकरेंनी लोकसभेनंतर कसं पुढे जायचे? या बद्दलही विचारणा केली. त्यावर, या घडीला कुठलीही कमिटमेंट देणे शक्य नाही, असे अमित शाह म्हणाले. विधानसभा देखील एकत्र लढवू पण तेव्हाचे जागावाटप, तेव्हाच ठरवू असं शाह म्हणाले. महत्त्वाचं म्हणजे, याआधी उद्धव ठाकरे यांच्यासोबत जे झाले त्याची पुनरावृत्ती व्हायला नको आणि म्हणूनच आता फक्त लोकसभेसंदर्भात बोलू, विधानसभेचं विधानसभेला ठरवू, अशी स्पष्ट भूमिका अमित शाहांनी मांडली असल्याचे कळत आहे.

उद्धव ठाकरे हे महायुतीतील भाजपचे जुने साथीदार आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचे सख्खे चुलत बंधू. 2019 च्या निवडणुकांनंतर चित्र पालटले आणि भाजप शिवसेनेचा काडीमोड झाला आणि उद्धव ठाकरेंनी काँग्रेस, राष्ट्रवादीला साथ देण्याचं ठरवलं. राज्यात महाविकास आघाडी अस्तित्वात आली आणि महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी उद्धव ठाकरे विराजमान झाले. पण त्यानंतर अवघ्या दोन वर्षांतच राज्यानं अभूतपूर्व राजकीय भूकंप अनुभवला. आजपर्यंत राज्याच्या सत्तानाट्यात दररोज म्हटलं तरी नवनवे अंक पाहायला मिळतायत. आगामी लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भाजपनं नवा डाव टाकत मनसेला युतीची ऑफर देऊ केली आहे. उद्धव ठाकरेंची सहानुभूतीची लाट मोडण्यासाठीच भाजपनं राज ठाकरेंची साथ घेण्याचं ठरवल्याचं बोललं जात आहे. अशातच येत्या काळात मनसे अध्यक्ष राज ठाकरे काय निर्णय घेणार हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

# मुंबईत तब्बल 72 लाखांची रोकड जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** निवडणूकीचे बिगुल वाजत नाही तोच घाटकोपरच्या पंतनगरमध्ये 70 लाखांची रोकड जप्त करण्यात आली आहे. इलेक्शन सेलच्या स्टॅटिक सर्विलेन्स स्कॉडने ही कारवाई केली आहे. या प्रकरणी दोन जणांना पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. इलेक्शन सेलच्या स्टॅटिक सर्विलेन्स स्कॉडने गाडीतून 72 लाख 39 हजार 675 रुपये जप्त केले आहेत.




ताब्यात घेण्यात आलेल्या व्यक्तींपैकी एक सीए तर दुसरा इनक्मटॅक्स प्रॅक्टिसनर असल्याचे समोर आलं आहे. जप्त करण्यात आलेली रक्कम एका विकासकाकडून पाठवण्यात आल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. या प्रकरणी पंतनगर पोलिस आणि इलेक्शन सेलच्या स्टॅटिक सर्विलेन्स स्कॉड अधिक तपास करत आहेत. देशात आचारसंहिता लागू झाली आहे. त्यामुळे पोलिस आणि निवडणूक अधिकारी सतर्क झाले आहेत. मंगळवारी रात्री पंतनगर पोलिसांनी गस्त घालत असताना एक संशियत गाडी थांबवली आणि तपासणी केली. या गाडीत पोलिसांना 72 लाख रुपयांची रोख आढळली आहे. मंगळवारी रात्रीपासून निवडणूक अधिकारी आणि आयकर विभाग या प्रकरणाचा तपास करत आहे. पोलिसांनी पकडलेल्या गाडीमध्ये दिलीप नाथानी, अतुल नाथानी हे दोन व्यक्ती होते, हे इनकम टॅक्स सल्लागार असल्याची सुत्रांची माहिती आहे. पंतनगर पोलिसांसह त्यांची चौकशी करण्यात येत आहे. हे पैसे कोणाचे आहेत आणि कशासाठी नेले जात होते, याचा पोलीस तपास करत आहेत. मात्र याबाबत पोलीस आणि निवडणूक अधिकाऱ्यांनी प्रतिक्रिया देण्यास नकार दिला आहे. लोकसभा निवडणुकीच्या तारखा जाहीर झाल्या आणि दुसरीकडे निवडणूक कक्षाच्या स्टॅटिक सर्व्हिलन्स पथकाने कारवाई सुरू केली आहे. मंगळवारी रात्री मुंबईतील घाटकोपर भागातील पंथनगरमध्ये निवडणूक कक्षाच्या स्टॅटिक सर्व्हिलन्स पथकाने 72 लाख रुपये जप्त केले. या प्रकरणी पंतनगर पोलिसांनी दोघांना ताब्यात घेतलं आहे. निवडणूक कक्षाच्या स्टॅटिक सर्व्हिलन्स पथकाने एका कारमधून 72 लाख 39 हजार 675 रुपयांचा मुद्देमाल जप्त केल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

ताब्यात घेण्यात आलेल्या दोघांपैकी एक सीए आणि दुसरा इनकम टॅक्स सल्लागार असल्याची माहिती आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, प्राथमिक तपासात ही रक्कम वाशी, नवी मुंबई येथील एका विकासकाची असल्याचे समोर आले आहे. याप्रकरणी पोलिसांनी उपजिल्हाधिकारी रवींद्र ठाकरे, तहसीलदार वृषाली पाटील, आयकर अधिकारी यांना माहिती दिली आहे. सर्व यंत्रणा या प्रकरणाचा तपास करत आहेत.

# मुंबई महापालिका आयुक्तपदी गगराणी

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** एकीकडे लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी चालू असताना दुसरीकडे महाराष्ट्रातील मुंबई तसेच उपनगरांत मोठे प्रशासकीय बदल करण्यात आले आहेत. मुंबई महापालिकेच्या आयुक्तपदी भूषण गगराणी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर ठाणे महापालिकेचे आयुक्तपद सौरभ राव यांच्याकडे सोपवण्यात आले आहे. यासह कैलाश शिंदे यांच्यावर नवी मुंबई महानगरपालिका आयुक्तपदाची जबबादारी देण्यात आली आहे.

निवडणूक आयोगानं महाराष्ट्र सरकारला ज्या अधिकाऱ्यांनी एखाद्या नियुक्तीच्या ठिकाणी तीन वर्षांपेक्षा अधिक वर्ष काम केलं असेल, त्यांची बदली करण्याच्या सूचना दिल्या होत्या. निवडणूक आयोगाचा स्पष्ट आदेश असूनही महाराष्ट्र सरकारनं अशा अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या नव्हत्या. महाराष्ट्रासह देशभरात जवळपास अशीच स्थिती होती. दोन दिवसांपूर्वी निवडणूक आयोगानं बदल्यांच्या मुद्यावर विविध राज्य सरकारांना दणका दिला होता. महाराष्ट्रात मुंबई महापालिकेचे आयुक्त इकबाल चहल यांची बदली करण्यात आली होती. त्यांना निवडणूक आयोगानं पदावरुन हटवलं होतं. निवडणूक आयोगाकडे महाराष्ट्र सरकारनं इकबाल चहल, आश्विनी भिडे आणि पी. वेलारुसू यांची बदली करण्यात येऊ नये अशी विनंती केली होती. मात्र, ती फेटाळण्यात आली होती. अखेर आयोगानंच बदल्या केल्या होत्या.

याआधी ठाणे महापालिका आयुक्त अभिजित बांगर आणि नवी मुंबईचे महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांची तडकाफडकी बदली करण्यात आली होती. केंद्रीय निवडणूक आयोगाच्या आदेशानंतर हा निर्णय घेण्यात आला होता. राजेश नार्वेकर यांच्याकडे सहकार आणि निबंधक सहकारी संस्था, पुणे या पदावर बदली करण्यात आली आहे.

# आरबीआयच्या सुचनेचे पालन न केल्यास बँक खाते होणार बंद

## सर्वच राष्ट्रीयीकृत बँका, सार्वजनिक बँकांमध्ये सी.के.वाय.सी.ची कामे

आधुनिक केसरी न्यूज


किरणकुमार आवारे

**निफाड :** बँक खाते सुरक्षित राहावे, यासाठी बँकांतर्फे ग्राहकांची वेळोवेळी के.वाय.सी केली जाते. बँक खात्याची आणखी सुरक्षितता वाढविण्यासाठी सी.के.वाय.सी करणे गरजेचे आहे. ती नसल्यास तुमचे खाते बंद पडणार आहे. त्यामुळे सी.के. वाय.सी करण्यासाठी ग्राहकांच्या बँकांमध्ये रांगा लागल्या आहेत. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या सूचनेनुसार, बँकांतर्फे ही प्रक्रिया केली जात आहे. यात राष्ट्रीयकृत बँकेसह खासगी बँकांमध्ये ज्यांनी सी.के.वाय.सी केले नाही, त्यांचे खाते बंद करण्यात येत असल्याची माहिती बँकांतर्फे देण्यात आली आहे. सी.के.वाय.सी संदर्भात सन २०१६ पासून आर.बी.आय.ने बँकांना याबाबत सूचना केलेल्या आहेत. दि.१ एप्रिल २०१७ पासून बँकांमध्ये जी खाते उघडली त्यांची सी.के.वाय.सी आहे. ही प्रक्रिया केल्यानंतर त्या ग्राहकांचा १४ अंकी युनिक कस्टमर आयडेंटिफिकेशन कोड तयार होतो. याचे काम सरसाई या नोडल कंपनीला देण्यात आले आहे. या संदर्भात दि.४ जानेवारीला आर.बी.आय.ने बँकांना पत्र काढून हे काम पूर्ण करण्याची सूचना केली आहे, त्यानुसार सर्वच बँकांतर्फे ग्राहकांशी संपर्क करून सी.के.वाय.सी करून घ्या, असे फोन करण्यात येत आहेत. खाते उघडल्यानंतर दहा दिवसांच्या आत सी.के.वाय.सी केलेली माहिती ही संकेतस्थळावर अपलोड करणे गरजेचे आहे. आरबीआयच्या निर्देशामुळे निफाड तालुक्यातील सर्वच राष्ट्रीयीकृत बँका, सार्वजनिक बँकांमध्ये सी.के.वाय.सी.ची कामे करण्यात येत आहेत. यासाठी स्टेट बँक ऑफ इंडियात मोठी गर्दी होत आहे. सर्वांच्या खात्यासाठी ही के.वाय.सी आवश्यक असल्याने बँकांमध्ये गर्दी होत आहे. काही ठिकाणी कुटुंबचे कुटुंबच येत आहे. एक व्यक्तीच्या सी.के.वाय.सी.साठी २० मिनिटे ते अर्ध्या तासांचा अवधी लागत आहे. यामुळे ज्येष्ठांची मोठी परवड होताना दिसून येत आहे. पेंशनधारक ग्राहकांना अगोदर हयात प्रमाणपत्र दाखल करण्यासाठी चकरा माराव्या लागल्या. त्यानंतर आता सी.के.वाय.सी.साठी बँकेत यावे लागत आहे.




आर.बी.आय.च्या सूचनेनुसार सर्व बँकांमध्ये सध्या सी.के.वाय.सी.ची प्रक्रिया सुरू आहे. आता बँक खात्यावर सरकारी योजनेतील पैसे थेट जमा होत असल्यामुळे ग्राहकांना ही के.वाय.सी करणे सक्तीचे आहे. ग्राहकांच्या दृष्टीने ही सुरक्षिततेची व फायद्याची आहे. त्यामुळे थोडा वेळ जाईल पण सी.के.वाय.सी.तून ग्राहक म्हणून तुम्ही सुरक्षित व्हाल. **रवींद्र निकम, बँक मित्र, बँक ऑफ महाराष्ट्र**






विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

कागदाचा शोध आणि छपाईचा शोध हा बऱ्याच नंतर लागला. परंतु त्यापूर्वी ग्रंथ हातानेच लिहिले जात. त्यासाठी भूर्जपत्र, ताडपत्र किंवा रेशमी कापडाचा वापर केला जाई. क्वचित ताम्रपत्रावर देखील लेख लिहिले जात. हाताने ग्रंथ लिहिणे हे अत्यंत जिकीरीचे होते. ताडपत्र किंवा भूर्जपत्र किंवा रेशमी कापड यावर लिहिण्यापूर्वी त्यावर विशिष्ट प्रकारची प्रक्रिया करावी लागायची आणि नंतरच त्यावर लिहिता यायचे. परंतु आपल्या पूर्वजांनी आणि ऋषीमुनींनी धर्म, तत्त्वज्ञान, विज्ञान, आयुर्वेद इत्यादी विषयांवर मूलभूत चिंतन करून अशा प्रकारचे ग्रंथ हाताने लिहून ठेवले आहेत. हे त्यांचे आपल्यावर मोठे उपकार आहेत. प्राचीन काळातील नालंदा, तक्षशिला यासारख्या विद्यापीठांमध्ये अशा प्रकारची हस्तलिखिते मोठ्या प्रमाणात होती. परंतु भारतावर झालेल्या विविध अशा आक्रमणांमध्ये आक्रमकानी हा मौल्यवान असा ठेवा नष्ट केला. काहीनी तो ठेवा आपल्या सोबत परदेशात नेला तर काही मौल्यवान ग्रंथ तत्कालीन लोकांनी त्यांचे प्राणापलीकडे संरक्षण केल्यामुळे वाचले. आपल्याला प्राचीन भारतीय संस्कृती, धर्म, तत्त्वज्ञान, प्राचीन काळातील लोकांची जीवनशैली आदी गोष्टी समजून घ्यायच्या असतील तर अशा प्रकारची प्राचीन हस्तलिखिते फार मोलाची ठरू शकतात.

संस्थेच्या तळमजल्यावरील ग्रंथालयात दुर्मिळ अशी हस्तलिखिते जीवापाड जपून ठेवली आहेत. बरीचशी हस्तलिखिते संस्कृत भाषेत आहेत. काही मराठी आणि काही तमिळ भाषेतील आहेत. 'ही हस्तलिखिते जतन करणे म्हणजे एक आव्हानात्मक काम असते. बरीचशी हस्तलिखिते जीर्ण झाली आहेत. त्यांना वाळवी लागण्याचा धोका असतो. सुरुवातीच्या काळात त्या हस्तलिखितातील पानांमध्ये वेखंडाची भुकटी टाकून कापडी गाठोड्यात ती बांधून ठेवली जायची. पण आता प्रत्येक हस्तलिखिते ब्रशच्या साहाय्याने हळुवार साफ केली जातात.






## आनंदी पहाट

## जीवनातील सार कशात आहे, हे समजून घ्यावे

आधुनिक केसरी

आपल्या प्रत्येक कृतीपूर्वी विचार होण्याची जरुरी असते. आनंदप्राप्तीसाठी सकारात्मक विचारांचा माध्यम म्हणून उपयोग करण्याची आपल्याला सतत जाणीव होणे आवश्यक असते. आनंद प्राप्ती म्हणजेच खरी यशप्राप्ती असते; हे ज्या व्यक्तीला समजते, त्याच व्यक्तीला त्याच्या जीवनातील सार कशात आहे, हेही कळू शकते. आपल्या अंतर्मनाला, अंतरात्म्याला शांती मिळणे मानसिक स्वास्थ्यासाठी अत्यंत आवश्यक असते. आपल्या दैनंदिन गरजांची पूर्तता करण्याच्या धावपळीत आपण आपली मुलभूत गरजच विसरून जातो, त्याची जाणीवच आपल्याला होत नाही. आपल्या जीवनातील सार कशात आहे, हे आपण स्वतःच शोधून काढायचे असते. त्याच्यासाठी आपल्या अंतरात्म्याचा शोध घेण्याची, त्याला समजून घेण्याची, त्याचा यथायोग्य विचार करण्याची जरुरी असल्याची आपल्याला जाणीव असलीच पाहिजे. आपल्या मनात येत असलेल्या प्रत्येक विचाराचा परिणाम कमी अधिक प्रमाणांत आपल्या मानसिकतेवर होत असतो. नकारात्मक विचारांचा विपरीत परिणाम होत असतो, तर सकारात्मक विचार यशप्राप्तीसाठी उपयुक्त ठरतात. आनंदाची गोडी अवीट असते, त्यामुळे आनंदप्राप्तीचा कधीच वीट येत नाही. आनंदाची प्राप्ती करण्यासाठी सकारात्मक विचार, वर्तन, व्यवहाराची गरज असते. त्यायोगेच सकारात्मक वातावरणाची निर्मिती होऊ शकते. आनंदाची निर्मिती आपल्याच अंतरंगांत करावी लागत असते. अंतरात्म्याला शांती मिळणे अत्यंत जरुरीचे असते,कारण त्यातच खरा आनंद असतो. आपल्या दैनंदिन गरजा भागवताना आपण केवळ शरीराचाच विचार करत असतो. अन्न, वस्त्र, निवारा ह्या तीनही गरजा खरे तर आपल्या शरीरासाठी आवश्यक असतात. आपल्याला त्या व्यतिरिक्त अजून एका गोष्टीची गरज असते, ती म्हणजे शांतीची.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

### ईश्वराचे जाणा | दास तुम्ही ||


आमुच्या घरात | भौतिकाची वाण ||
परमार्थाची खाण | शांतीरूप ||१||
दारिद्र्याची येथे | असते झालर ||
सोने अलंकार | समाधान ||२||
आमुच्या दारात | फुलते तुळस ||
झळाळे कळस | चैतन्याचा ||३||
चाले हरिनाम | जेथे रात्रंदिन ||
आम्हा ते सदन | विठोबाचे ||४||
नश्वराचे ठायी | नको गुंतू मना ||
ईश्वराचे जाणा | भक्त तुम्ही ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## हितगुज





**गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे, दिंडोरी (नाशिक)**


### येळकोट येळकोट

परब्रह्म शिव व जगन्माता पार्वती अनेक नाम रूपांनी या हाराष्ट्रवासियांची कुलदेवता, कुलस्वामिनी बनून पिढ्यानपिढ्या त्यांचे संरक्षण करीत आहेत. देव्हाऱ्यातले त्यांचे टाक 'माणूसपणाची' जपणूक संस्कारांच्या माध्यमातून घराघरांत करीत आहेत. संपूर्ण कुटुंबांचा सांस्कृतिक अनुबंध या केंद्र स्थानी विराजमान देवत्वाशी घट्टपणे रुजला, वाढला आहे. म्हणून 21 व्या शतकात नानाविध बाह्य रूपांतरे घडून ही महाराष्ट्रीयांची मनातली श्रद्धा आजही अभेद्य आहे. मल्हारी मार्तंड खंडोबा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, साहित्यिक, धार्मिक, सामाजिक परंपरा व इतिहासाचे लोकतात्त्विक स्वरूप व मर्म आहे. म्हाळसाकांत खंडोबा अतिप्राचीन पौराणिक दैवत आहे. पराक्रमाचे, वीरतेचे लेणे ल्यालेल्या महाराष्ट्राने शिव, भवानीची वीरश्रीच्या तेजाने तळपणारी असुर-विनाश करणाऱ्या कथारसात भिजलेली कुलदैवतांची रूपे, विग्रह स्वीकारलेली आहे. भगवान शिवाने मार्तंड-भैरवाचे रूप धारण करून मणी व मल्ल दैत्यांचा वध केला म्हणून मल्हारी-मार्तंड त्यास म्हटले जाते. खड्ग किंवा खांडा म्हणजेच तलवार हाती घेतलेले परमेश्वराचे श्रेष्ठ स्वरूप खंडोबा होय. दक्षिणेत ही खंडोबाची उपासना केली जाते. समाजाच्या सर्व स्तरात समान रूपाने लोकप्रिय, श्रद्धाप्राप्त असे हे कुलदैवत आहे. जेजूरी हे खंडोबाचे मूळ स्थान, या व्यतिरिक्त महाराष्ट्रात सहा अन्य ठिकाणी व कर्नाटकात पाच ठिकाणी खंडोबाची जागृत स्थाने आहेत. मासोत्तम मार्गशीर्षात खंडोबा नवरात्राच्या निमित्ताने जेजूरीला मोठी यात्रा भरते, खंडोबाचा गोंधळ व भंडार्याची उधळण संपूर्ण गडावर असाधारण देवत्वाचे वातावरण निर्माण करते. संतांनी जेजूरी व जेजूरीचा स्वामी खंडेरायांच्या विषयी महत्त्वपूर्ण संदर्भ व वर्णन शब्दबद्ध केली आहेत.

**संकलन : बाजीराव सोनवणे, नाशिक**
**संपर्क क्र. ९९२२४२००३४**

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

**हीरा मणि माणिक सकल,**
**मूल्य सबन का होय ।**
**सद्गुरु वचन अमूल्य है, परम पुरुष मिल**
**सोय ।।१२।।(स्वर्वेद द्वितीय मण्डल**
**नवम अध्याय) ०२/०९/१२**
**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**
**हीरा, मणी, माणिक आदि सर्व रत्नांना ठराविक मूल्य असते परंतू सद्गुरू-वचनाचे मूल्य होऊ शकत नाही. ज्या वचनास ग्रहण केल्याने परमात्म्याची प्राप्ती आणि जन्म-मृत्यूच्या फेऱ्यातून निवृत्ती होते.**




स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

## नामाचे प्रेम का येत नाही ?

आधुनिक केसरी

आज इतकी वर्षे होऊन गेली तरीसुद्धा ज्ञानेश्वर, तुकाराम, समर्थ रामदास यांच्यासारख्या थोर संतांचे नाव टिकून राहिले आहे. याचे खरे कारण हे की, त्यांचे नामावर अत्यंत प्रेम होते. या सर्व संतांच्या वचनांवर आपण विश्वास ठेवतो. त्यांच्याप्रमाणे नामाचे प्रेम आपल्यालाही यावे असे आपल्याला वाटते. पण ते प्रेम आम्हाला का उत्पन्न होत नाही, याचा विचार आपण करायला पाहिजे. त्या नामाला उपमा देताना, ते अमृतापेक्षाही गोड आहे असे त्यांनी सांगितले. नामाला अमृताची उपमा देताना, त्या अमृताच्या पलीकडे दुसरी गोष्टच नाही असे आपण म्हणतो. मग त्या नामाचे प्रेम आम्हाला का बरे नसावे ? तर त्या नामाच्या आड काही तरी येत असले पाहिजे हे खास. ज्याप्रमाणे आपण तोंडात साखर घातल्यावर आम्हाला जर ती गोड लागली नाही, तर तो दोष साखरेचा नसून आमच्याच तोंडाला चव नाही असे आपण म्हणतो, त्याप्रमाणे नामाची गोडी आमच्या अनुभवाला येत नसेल, तर आमच्यामध्येच काही तरी दोष असला पाहिजे खास. नामाचे प्रेम येण्याला



बहुतेक लोक काही ना काही अडचणी सांगतात. कुणाला विचारले, "नामाचे प्रेम का येत नाही ?" तर तो सांगतो, "माझे लग्न झाले नाही. ते होऊन प्रपंच, मुलेबाळे हे सर्व झाल्यावर मला नामाचे प्रेम येईल." पण लग्न करून मुलेबाळे असलेल्या किती लोकांना नामाचे प्रेम लागले आहे ? कोणी म्हणतो, "पैसा नाही म्हणून प्रपंचाची काळजी वाटते आणि नामाचे प्रेम येत नाही." परंतु अगदी भरपूर पैसा असलेल्या किती लक्षाधीशांनी नामाचे प्रेम मिळविले आहे ? कोणी म्हणतो, "या प्रपंचात बायकोमुले, आजारपण, शेतीवाडी यांच्या व्यापामुळे आम्हांला नामाचे प्रेम लागत नाही;" तर कोणी म्हणतो, "प्रपंचात राहून मला आता कंटाळा आला आहे; मी आता संन्यास घेतो, म्हणजे मला नामाचे प्रेम येईल;" तर कोणी प्रापंचिक दुःखाला कंटाळून अगदी आत्महत्या करायला निघतो. अशा रीतीने, सर्वजण ज्या परिस्थितीत असतात त्या परिस्थितीत नामस्मरणाला अडचणच सांगत असतात. नामाचे प्रेम न यायला खरोखरच परिस्थिती कारणीभूत आहे का, याचा विचार आपण करायला पाहिजे. मला वाटते, नामाचे प्रेम न यायला खरोखर कारण कोणते असेल, तर भगवंत हवा असे आम्हाला मनापासून वाटतच नाही. भगवंत हवा आहे असे वाटणे, हे खरोखर भाग्याचे लक्षण आहे. तुम्हाला खरोखरच भगवंत हवा आहे असे वाटू लागले म्हणजे त्या हवेपणातच त्याच्या प्राप्तीचा मार्ग दिसू लागेल. ५८. नामाची गोडी अशी विलक्षण आहे की, ज्याला ती लागली त्याला स्वतःचे भान राहात नाही. म्हणून नामाला वाहून घ्यावे.

## अनिर्वाच्यनिरूपण

आधुनिक केसरी



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

पोकळ कवचामध्ये भरीव धान्य सापडते. त्याप्रमाणे धान्य निवडून परब्रम्ह रूपी अर्थ समजल्यावर फोलपट रूपी शब्द आपोआपच गळून पडतात. म्हणून आत्मसाक्षात्काराशी शब्द जाऊ शकत नाहीत. समर्थानी आपले भाषेचे तत्वज्ञान यात सांगितले आहे. आपली मराठी भाषा किती ज्ञानी आहे त्यासाठी 5 तत्वज्ञाच्या भाषा विषयक गोष्टी सांगितल्या आहेत. 1)भाषेचे प्रधान कार्य 2)शब्द अर्थ यांचा संबंध 3)अर्थाचे स्वरूप काय. 4)अर्थ आणि सद्वस्तु यांचा संबंध काय 5)जे अनिर्वाच्य आहे ते भाषेत किती व कसे आणता येते. भाषेला दोन अंगे असतात शब्दोच्चार हे भाषेचे बाह्यांग आणि शब्दांश हे भाषेचे अंतरंग आहे.

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
गुरूवार, २१ मार्च २०२४
adhunikkesari.com

# अब की बार भाजप तडीपार : उद्धव ठाकरे

## भाजपचे मनसुबे लोकसभा निवडणुकीत उद्ध्वस्त करून गद्दारांना जमिनीत गाडण्याचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**सिंदखेडराजा :** पंतप्रधान नरेंद्र मोदी आज उघडपणे गुजरातबद्धल विशेष ममत्व दाखवून राज्याराज्यांत शत्रुत्वाच्या भिंती उभे करीत असल्याचा घणाघात शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केला. भाजपच्या 'अब की बार चारसो पार' घोषणेची खिल्ली उडवून 'अब की बार भाजप तडीपार' असा नारा दिला. देशात रशिया सारखी निरंकुश हुकूमशाही आणू इच्छिणाऱ्या भाजपचे मनसुबे लोकसभा निवडणुकीत उध्वस्त करून महाराष्ट्रातील गद्दारांना जमिनीत गाडण्याचे आवाहनही त्यांनी केले. सिंदखेडराजा येथे आज बुधवारी रणरणत्या उन्हात जनसंवाद सभा पार पडली. यावेळी जिजामातेच्या माहेरातून त्यांनी लोकसभा निवडणुकीचे रणशिंग फुंकले. यावेळी विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे, खासदार संजय राऊत, आमदार नितीन देशमुख, जिल्हा संपर्क प्रमुख नरेंद्र खेडेकर, जिल्हा प्रमुख जालिंदर बुधवत यांची प्रमुख उपस्थिती होती.

या सभेत ठाकरे यांनी भाजप आणि शिवसेनेच्या गद्दारांवार टीकेची तोफ डागली. पंतप्रधान नरेंद्र मोदींना केवळ आणि केवळ गुजरात बद्दल ममत्व का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. आताही सेमिकंडक्टरचे देशात येऊ घातलेले दोन प्रकल्प पुन्हा गुजरातला नेल्याचा गौप्यस्फोट ठाकरेंनी केला. हे पक्ष महाराष्ट्र तर सोडा, पण उत्तरप्रदेश, उत्तराखंडला का नाही? असा प्रश्न त्यांनी विचारला. भाजप म्हणजे भाडोत्री जनता पार्टी आहे. भाजपने यंदा 'अब की बार चारसो पार' असा नारा दिला आहे. मात्र, हे अशक्य असून जनतेने देशावरील हुकूमशाहीचा धोका वेळीच ओळखून अशा प्रवृत्तीला ठेचणे काळाची गरज असल्याचे ठाकरे म्हणाले. जनता हे करणारच असून यंदा देशात परिवर्तन अटळ असल्याचे भाकित करून 'अबकी बार भाजपा तडीपार' असा नारा त्यांनी टाळ्यांच्या कडकडाटात दिला. शिवरायांच्या राज्यात अजूनही गद्दारांना थारा नाही हे जनता दाखवून देणार ही काळ्या दगडावरची रेष असल्याचा आत्मविश्वास




ठाकरेंनी बोलून दाखविला. महाराष्ट्रात शिवरायांचा जन्म झाला. औरंगजेबचा जन्म गुजरात मधील दाहोद येथे झाल्याचे सांगून यामुळे मोदी, शहा यांच्यात औरंगजेबी वृत्ती आहे. त्यांना महाराष्ट्र लुटायचा आहे, मुंबई विकायची आहे अन मराठी माणूस संपावायचा आहे. मात्र, या कारस्थानात बाळासाहेबांची शिवसेना, उद्धव ठाकरे आड येतात. यामुळे त्यांनी सेनेचे दोन तुकडे केले. यामुळे समाधान न झाल्याने राष्ट्रवादी फोडली, काँगेसचे चव्हाण यांना घेऊन गेले. ते कचऱ्याची गाडी घेऊन फिरताहेत, इकडून तिकडून 'कचरा' जमा करताहेत. मात्र, त्याचा काडीमात्र फायदा होणार नाही. तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी (मोदींना) कचऱ्याची टोपली दाखवीत असताना केवळ बाळासाहेब ठाकरे त्यांच्या बाजूने उभे ठाकल्याने ते बचावले. मात्र, आज ते त्याच शिवसेनेला संपवायचा प्रयत्न करताहेत. मात्र मर्द मावळ्यांची, वाघांची सेना सहजासहजी संपणार नाही, असा विश्वास ठाकरे यांनी बोलून दाखविला. ईडी, सीबीआय भाई-भाई ईडी, सीबीआय, आयकर हे आता त्यांच्यासाठी भाई मंडळी झाली आहे. ते (या संस्था) 'भाई' पण आहे अन घरगडी सुद्धा असल्याची टीका उद्धव ठाकरे यांनी यावेळी केली. अंबादास दानवे, संजय राऊत यांनी महाराष्ट्राच्या भूमीत गद्दारांना माफी नसल्याचे सांगितले.




## आम आदमी पार्टीच्या महिला प्रदेशाध्यक्ष सीमा शिवाजी गुट्टेंचा काँग्रेस पक्षात प्रवेश

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** लोकसभा निवडणुकीच्या धामधुकीत काँग्रेस पक्षात प्रवेश करणाऱ्या इच्छुकांची संख्या वाढत आहे. आम आदमी पार्टीच्या महिला प्रदेशाध्यक्ष सीमा शिवाजी गुट्टे यांनी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांच्या उपस्थितीत सोमवारी टिळक भवनमध्ये काँग्रेस पक्षात प्रवेश केला यावेळी नाना पटोले यांनी सीमा गुट्टे यांचे काँग्रेस कुटुंबात स्वागत केले. सीमा गुट्टे यांनी सामाजिक, शैक्षणिक व महिला सशक्तीकरणासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. आम आदमी पार्टीच्या पुणे जिल्हा महिला बचत गटाच्या जिल्हाध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम पाहिले आहे. मुलींच्या शैक्षणिक समस्यांवर कार्यशाळा आयोजित करणे, महिलांसाठी आरोग्य शिबिरे, सामाजिक ऐक्य व राष्ट्रीय उत्सवांमध्ये त्यांचा नेहमी सहभाग राहिला आहे. देश सध्या बिकट परिस्थितीतून जात असताना काँग्रेसची विचारधाराच या देशाला तारु शकते. सर्व समाज घटकांना न्याय देण्याची काँग्रेस पक्षाची परंपरा राहिली आहे. भारत जोडो न्याय यात्रेमुळे सर्वसामान्य जनतेचा काँग्रेस पक्षावरील विश्वास आणखी दृढ झाला आहे. भारत जोडो न्याय यात्रेच्या दरम्यान महिला सक्षमिकरणावर विशेष भर देत 'महिला न्याय' च्या पाच गॅरंटी काँग्रेस पक्षाने दिलेल्या आहेत. काँग्रेसमध्ये प्रवेश घेणाऱ्यांची संख्या वाढत असून लवकरच इतर पक्षातील आणखी लोक काँग्रेसमध्ये प्रवेश करतील" असे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यावेळी म्हणाले. या पक्षप्रवेशावेळी प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष संघटन व प्रशासन नाना गावंडे हे उपस्थित होते.

## दिलीप मोहिते पाटील जेव्हा मंत्री होतील, तेव्हा मी मुख्यमंत्री होईल : अजित पवार

आधुनिक केसरी न्यूज




**खेड :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने बारामतीतसह वेगवेगळ्या मतदारसंघात दौरे सुरू केले आहेत. आज २० मार्च रोजी अजित पवार यांनी खेड तालुक्याचा दौरा केला. या दौऱ्यावेळी त्यांनी कार्यकर्त्यांच्या भेटीगाठी घेतल्या. या भेटीदरम्यान निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर त्यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. आंबेगाव, जुन्नर, खेड, शिरूर, भोसरी असा दौरा अजित पवारांनी केला. यावेळी त्यांनी आमदार दिलीप मोहिते पाटील यांची भेट घेतली. या भेटीदरम्यान अजित पवार यांनी दिलीप मोहिते पाटील यांना मिश्किल टोला लगावला.

अजित पवार पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करत असताना त्यांच्या काही कार्यत्यांनी अजित पवार मुख्यमंत्री व्हायला पाहिजेत, अशी मागणी केली. कार्यकर्त्यांच्या या मागणीवर अजित पवार यांनी मुख्यमंत्रिपदाबाबत विधान केले. त्यांचे हे विधान चांगलेच चर्चेत आले. "ज्या वेळेस दिलीप मोहिते पाटील मंत्री होतील, तेव्हा मी मुख्यमंत्री होईल", असे अजित पवार म्हणाले. राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाने लोकसभेची जोरदार तयारी केली आहे. पुण्यातील शिरूर लोकसभा मतदारसंघ अजित पवार गट लढवण्यासाठी इच्छुक आहे. राष्ट्रवादीकडून शिवाजीराव आढळराव पाटील निवडणूक लढवणार असल्याची चर्चा आहे. यासदंर्भाने उपमुख्यमंत्री अजित पवार, दिलीप वळसे पाटील आणि शिवाजीराव आढळराव पाटील यांच्यात चर्चा झाली. मात्र, या चर्चेत नेमके काय ठरले? याबाबत कोणतीही माहिती समोर आली नाही. अजित पवार गटाची लोकसभा उमेदवारांची यादी अद्याप जाहीर झालेली नाही. त्यामुळे कोणत्या मतदारसंघात कोणता उमेदवार असणार? हे स्पष्ट झालेले नाही.

शिरूर लोकसभा मतदारसंघात अजित पवारांनी अधिक लक्ष घातले असल्याचे चित्र सध्या दिसते. काही दिवसांपूर्वी अजित पवार यांनी खासदार अमोल कोल्हे यांच्यावर टीका करत आव्हान दिले होते. "एका खासदाराने मतदारसंघात पाच वर्षे लक्ष दिले असते, तर खूप चांगले झाले असते. मात्र, आता शिरूरमधून उमेदवार निवडून आणणारच", असे अजित पवार म्हणाले होते. यानंतर आता अजित पवार हे स्वतः स्थानिक नेते, पदाधिकाऱ्यांच्या भेटीगाठी घेत आहेत.

## भाजपच्या जिल्हा कार्यालयात महायुतीचा कार्यकर्ता मेळावा

आधुनिक केसरी न्यूज

**उल्हासनगर :** उल्हासनगरमधील भारतीय जनता पक्षाच्या जिल्हा कार्यालयात महायुती चा कार्यकर्ता मेळावा आयोजीत करण्यात आला होता या मेळाव्याला सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी या मेळाव्याला मार्गदर्शन केले.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान बनवण्यासाठी आणि ४००+ पार करण्यासाठी व देशात फिर एक बार मोदी सरकार चे स्वप्न पूर्ण करण्याकरिता कार्यकर्ता मेळावा आयोजित करण्यात आला होता.

या वेळी १४१ उल्हासनगर विधानसभा आमदार कुमार आयलानी,कल्याण जिल्हा प्रमुख गोपाल लांडगे,भाजपा जिल्हा अध्यक्ष प्रदीप रामचंदानी,विधानसभा निवडणुक प्रमुख जमनू पुरसवानी,सिंधी साहित्य अकादमी कार्याध्यक्ष महेश सुखरामनी,शिवसेना शहर प्रमुख राजेंद्रसिह भुल्लर महाराज,कलवंतसिंह सोहेटा(बिट्टू भाई)यांच्यासह महायुतीचे नगरसेवक,भाजपा जिल्हा पदाधिकारी, मंडळ अध्यक्ष,पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# मोइत्रा अडचणीत

आधुनिक केसरी

कॅश फॉर क्वेरी प्रकरणावरील नीतिमत्ता समितीचा अहवाल आल्यानंतर तृणमूल काँग्रेसच्या महुआ मोइत्रा यांना लोकसभेतून बडतर्फ करण्यात आलं. मोइत्रा यांनी लोकसभेत प्रश्न विचारण्यासाठी व्यावसायिक दर्शन हिरानंदानी यांच्याकडून रोख रक्कम आणि महागड्या भेटवस्तू घेतल्या होत्या असा आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला होता. महुआ मोइत्रा आता पुन्हा एकदा लोकसभेच्या रिंगणात उतरल्या आहेत. टीएमसीने त्यांना पश्चिम बंगालमधील कृष्णानगर लोकसभा मतदारसंघातून तिकीट दिलं आहे. दरम्यान, मोइत्रा यांच्यासमोरील अडचणी वाढल्या आहेत. पैसे घेऊन लोकसभेत प्रश्न विचारल्याप्रकरणी केंद्रीय अन्वेषण विभागाला मोइत्रा यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यामुळे सीबीआय आता मोइत्रा यांच्याविरोधात गुन्हा दाखल करणार आहे. याशिवाय लोकपालांनी सीबीआयला सहा महिन्यांच्या आत यासंबंधीचा अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. लोकपालांनी त्यांच्या आदेशात म्हटलं आहे की, सध्या आमच्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीचं सावधपणे विश्लेषण आणि विचारमंथन करूनच मोइत्रा यांच्यावर आरोप ठेवण्यात आले आहेत. मोइत्रा यांच्यावर ठेवण्यात आलेले आरोप योग्य आहेत आणि यामध्ये आम्हाला कुठलीही शंका नाही. त्यांच्याविरोधातले अनेक पुरावे आमच्यासमोर आहेत. हे एक गंभीर प्रकरण असल्याने, तसेच त्यांच्या पदाचा विचार करता आम्हाला वाटतें की, या प्रकरणातलें संपूर्ण सत्य बाहेर यावे. त्यासाठी याप्रकरणाचा तपास करणे आवश्यक आहे. लोकपालांनी त्यांच्या आदेशात म्हटले आहे की, कोणत्याही लोकप्रतिनिधीच्या खांद्यावर अधिक जबाबदारी असते. तसेच त्यांच्या खांद्यावर लोकशाहीचे ओझे असते. त्यांनी लोकशाही मुल्ये जोपासली पाहिजेत. तसेच भ्रष्टाचार हा असा रोग आहे जो लोकशाही असलेल्या राष्ट्राच्या विधीमंडळ, प्रशासकीय, सामाजिक आणि आर्थिक कामकाजावर विपरित परिणाम करतो. भ्रष्टाचारामुळे लोकशाहीसमोरची आव्हाने वाढतात. त्यामुळे भ्रष्टाचार आणि अशा प्रथांचे समूळ उच्चाटन व्हायला हवे. त्यासाठी शक्य ते सर्व प्रयत्न करणं हे आपले कर्तव्य आहे. संसदेत प्रश्न विचारण्यासाठी लाचखोरी आणि लॉग-इन आयडी-पासवर्ड अन्य व्यक्तीला देणे ही दोन्ही कृत्ये अत्यंत आक्षेपार्ह, अनैतिक व गुन्हेगारी स्वरुपाची आहेत. याआधारे मोइत्रा यांची खासदारकी रद्द करण्यात यावी (त्यानुसार मोइत्रा यांची खासदारकी रद्द करण्यात आली) यासंदर्भात विशिष्ट मुदतीत केंद्र सरकारने अधिक चौकशी करावी (लोकपालांनी याप्रकरणी चौकशी करून सीबीआयला तपास करण्याचे आदेश दिले आहेत.)

# शिक्षण संस्थाचालक गुणवत्तेकडे लक्ष का देत नाहीत ?



राम कुलकर्णी,
संपर्क 9422742577

आधुनिक केसरी

**वर्तमान शिक्षण व्यवस्थेत स्थापन केलेल्या संस्था चालवणे तसं पहाता तारेवरची कसरत होवुन बसलेली असुन अनेक आव्हान, शिक्षण स्पर्धा किंवा लागलेली चढाओढ कारणीभुत ठरते. नविन शैक्षणिक धोरण पुढे घेवुन जाताना खऱ्या अर्थाने शिक्षण संस्था चालवणाऱ्यांनीच गुणवत्तेच्या आधारावर अंगातली मरगळ झटकणे क्रमप्राप्त वाटते. शाळा, महाविद्यालय चालु करायची आणि सारी जबाबदारी प्राचार्य, मुख्याध्यापकांवर टाकायची. कागदोपत्री घोडे नाचवत घरबसल्या आर्थिक व्यवहार बघायचा या नादात संस्था चालक पडत असल्याने गुणवत्तेकडे लक्ष्य देणे मुश्किल झाले.**

ज्यामुळे कुठल्याही प्रकारचं नियंत्रण संस्थामार्फत चालणाऱ्या युनिटवर राहिलेले दिसत नाही. संस्थेत काम करणारा सेवकांपासुन कर्मचारी आणि अध्यापन वर्ग त्यांच्याकडून रांगेत उभा राहुन येणारे नमस्कार शिवाय काही अर्थहीन आणि अर्थ गोष्टी यातच संस्थाचालक स्वतःला धन्य समजतात. मात्र जे संस्थाचालक कटाक्षाने शिक्षण संस्था चालवतात त्यांचीच गुणवत्ता आगामी काळात टिकु शकते किंवा वादु शकते यात शंका नाही. देश विदेशाची चर्चा करण्यापेक्षा महाराष्ट्रात शिक्षणाचा बाजार मोठ्या प्रमाणावर मागच्या वीस-पंचेवीस वर्षापासुन फोफावला यात शंकाच नाही. शासकिय तथा अनुदानित विना अनुदानित अशा स्वरूपाचे शैक्षणिक दालन मग प्राथमिक शाळेपासुन माध्यमिक, उच्च माध्यमिक, कनिष्ठ महाविद्यालय, वरिष्ठ महाविद्यालय, पदव्युत्तर, मेडिकल कॉलेज, अभियांत्रिकी कॉलेज, लॉ कॉलेज, आयटीआय एवढेच नव्हे तर कौशल्य ज्ञान, महिला कॉलेज, नर्सिंग, डी.एड., बी.एड. आदी प्रकारचे ज्ञान केंद्र या राज्यात चालवले जातात. ज्याला शिक्षणाचा बाजार देखील म्हणु शकतो. एकेकाळी डी.एड., बी.एड. करण्यासाठी लाखावर मोजायला जायचे. तेच डी.एड., बी.एड. आज ओसाड पडले. कारण प्राध्यापक, शिक्षक भर्ती प्रक्रिया बंद त्याचा परिणाम असु शकतो. वास्तविक पहाता ज्ञानदानाचं कार्य करण्याचा उद्देश आणि शिक्षण संस्था चालकांच्या अंगी असलेले संवेदनशीलता अत्यंत महत्वाचं म्हणुन पहायल्या जातं. राज्यात अशा अनेक शिक्षण संस्था नामांकित आणि पावित्र्य ठेवुन आजही काम करताना दिसतात. वास्तविक वेगवेगळ्या वैचारिक विचाराच्या कार्यप्रणालीतुन काम करणाऱ्या शिक्षण संस्था समाजाभिमुख कार्य करून दाखवतात. आजच्या शिक्षणाच्या बाजारात अशा अनेक आदर्श शिक्षण संस्था ज्यांचं नाव आजही सामान्य लोकांच्या ओठावर आहे. माय मराठी शिकवताना इंग्रजी राक्षसासारखी या क्षेत्रात घुसली म्हणुन मराठी शाळांपेक्षा इंग्रजी शाळांचे दालन मोठ्या प्रमाणावर उदयास येवु लागले. तसं पाहता मातृभाषेतलं शिक्षण प्राधान्य द्यायला हवे. इंग्रजी शाळा आणि त्यातली आर्थिक उलाढाल जणु काही आर्थिक लाभासाठीच सारी धडपड सुरू असं देखील म्हणता येईल. राज्य सरकारने शिक्षण व्यवस्था चालवण्यासाठी शैक्षणिक नियमावली घालुन दिलेली आहे. शिक्षण संस्था चालकाने देखील कशा प्रकारे काम करावे ? याचे नियम असुन प्राचार्य, मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक यांच्या बाबतही नियमावली अधीन काम आहे. ही गोष्ट खरी आहे की, वर्षानुवर्षे काँग्रेस विचाराचं देशात आणि राज्यात सरकार असल्याने आजही शिक्षण क्षेत्रात खऱ्या अर्थाने राष्ट्रवादी आणि काँग्रेस विचाराचा पगडा मोठ्या प्रमाणावर आढळुन येतो. ज्यांनी गुणवत्ता हेतु जणु काही



खड्यासारखा बाजुला ठेवत अर्थकारणाला जास्त महत्व दिलं. या नादात अनेकांच्या शिक्षण संस्था बंद पडल्या तर अनेक शिक्षण संस्थावर लोकांचा विश्वास राहिलेला नाही. चढाओढीच्या वादातुन बहुतेक शिक्षण संस्थेत सुरू असलेले वाद शैक्षणिक विकासाच्या आड येण्यासाठी निश्चित कारणीभुत ठरतात तो भाग वेगळा. सरकार कर्मचाऱ्यांना पगार देते. अनुदानावर चालणाऱ्या शिक्षण संस्थेला बऱ्याच गोष्टी सरकार मार्फत मिळतात. मात्र विनाअनुदानित शिक्षणाची केंद्र अतिशय कष्टाने आणि कठोर परिश्रमातुन चालवावे लागतात. बाहेरच्या राज्यात डोकावण्यापेक्षा याच राज्यात एक शिक्षण संस्था चालक असे आहेत की ज्यांच्या मालकीच्या १०० पेक्षा अधिक शाळा, महाविद्यालय, वेगवेगळे युनिट आहेत. सामाजिक दायित्व आणि कर्तव्यातली जबाबदारी ओळखुन काम करणारा शिक्षक बांधव खऱ्या अर्थाने प्रतिभावंत असतो. प्राध्यापक असो किंवा शिक्षक सरस्वतीच्या दरबारात त्याच्याकडून होणारे ज्ञानार्जन देशाच्या नव्या पिढीला भक्कम बनवणारं साधन असतं. मुळातच शिक्षकी पेशा पवित्र असुन जो शिक्षक तो खऱ्या अर्थाने स्वतःला धन्य समजत असावा. ज्याच्या नशिबाला पेशा आला. शिक्षक समाजासाठी आदर्श घटक असुन त्याच्या वर्तणुकीवर आदर्श संस्कार समाज निर्मिती होवु शकते आणि होत आली. एक काळ एखाद्या गावात एक शिक्षक तो गावकऱ्यांसाठी परमेश्वर असायचा. आजही सामान्य लोकांच्या मनात शिक्षकांच्या विषयी असलेली भावना उत्तमच आहे. पण धनलक्ष्मीच्या लोभापायी स्वतःची कर्तव्य आणि जबाबदारी याचा देखील अनेकांना विसर पडत असुन आपल्या पेशाशी होत असलेली गद्दारी खरं तर बरं नव्हे. शिक्षकामधी मरगळ का आली? कारण जिल्हा परिषद मार्फत चालणाऱ्या शाळा असो किंवा खासगी शिक्षण संस्था मार्फत चालणाऱ्या शाळा असो.

यात वरिष्ठ ठिकाणी काम करणारे अधिकारी देखील कारणीभुत आहेत ज्यांना जबाबदारीचं भानच राहिलेले नाही. मुळात शिक्षण संस्थाचालक यांनीच खऱ्या अर्थाने जागृत राहुन संस्था चालवायला हव्यात. मुख्याध्यापक, प्राचार्य किंवा इतर पदावर काम करणारी मंडळी आपले कर्तव्य पार पाडतीत का? विद्यापीठ तथा माध्यमिक बोर्डाने प्राथमिक बोर्डाने ठरवून दिलेल्या उपक्रमाप्रमाणे कार्यक्रम होतात का? गुणवत्तेच्या आधारावर लोक काम करतात का? सिल्यैबस शिकविल्या जातो का? पळविल्या जातो? स्वतःच्या संस्थेमार्फत राबवण्यात येणारी आचारसंहिता ज्याचे पालन होतं का? शाळा असो किंवा कॉलेज अध्ययन, अध्यापन कशा प्रकारे होतं? गुणवत्तेच्या स्पर्धेत आपण कुठे आहोत? या साऱ्या गोष्टीवर बारकाईने नजर शिक्षण संस्था चालकाने ठेवायला हवी. आर्थिक व्यवहाराला प्राधान्य देताना केवळ व्यक्ति केंद्रित होवुन जिथे युनिट चालतात तिथे गुणवत्तेची ऐशी की तैशी. केंद्र आणि राज्य सरकारने नविन शैक्षणिक धोरण स्विकारले असुन अनेक वर्षाच्या तपानंतर केंद्र सरकारने चालु वर्षापासुन लागु केले आहे. वास्तविक पहाता विद्यार्थ्यांच्या कल्याणकारी जीवनाचा उत्तम मार्ग म्हणजे नविन शैक्षणिक धोरण ज्यातुन खऱ्या अर्थाने शाळेची पायरी चढल्यापासुनच राष्ट्रभक्तीची भावना तर दुसऱ्या टप्यात स्वावलंबी जीवनाचा मार्ग एवढेच नव्हे तर व्यक्तिमत्व विकासाची कडी असं हे नविन शिक्षणाचं धोरण येवु घातलं आहे. आव्हानाला तोंड देत असताना ज्या शिक्षण संस्थाचालकाचे किंवा संचालक मंडळाचे गुणवत्तेवर पुरक साधनाचा उपयुक्त वापर करत विशेष लक्ष्य आहे अशाच शिक्षण संस्था समाजात खऱ्या अर्थाने काम करू शकतील. सरकार आणि त्यांच्या समोर असलेल्या अडचणी मग प्राध्यापकाची अडलेली भरती असेल किंवा तासिका तत्वावरचे प्रयोग असतील सारी तारेवरची कसरत असुन जागृत राहुन शिक्षण संस्था चालवणे तरच खऱ्या अर्थाने शिक्षण संस्थेचा सर्वांगिण विकास म्हणावा लागेल.

# इतरांच्या मतांबद्दलचे चिंतन थांबवा



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**अमुक व्यक्ती आपल्याविषयी काय बोलला तमुक व्यक्ती काय बोलला मग का बोलला असेल मग कारणं काय असेल हेतु काय असेल आपण त्याला किती सहकार्य केले तरी तो असं का बोलला यावर आपण इतक व्यर्थ चिंतन करतो कि जीवनातील अमुल्य किंमती वेळ नको त्या चिंतनात व्यर्थ घालवतो आणि मग शेवटी पदरी काय पडतं तर दुःख याचं चिंतनातून निर्माण होणार दुःख आपल्या जीवनातील दुःखांचा खुप मोठा स्त्रोत आहे आणि हा स्त्रोत फक्त आपला विवेक संपुष्टात आणु शकतो म्हणून आपला विवेक हा सदैव जागृत असला पाहिजे.मग बोलणारा हा त्यांच्या कड असणार्या सामर्थ्य नुसार बोलत असतो शेवटी त्याने काय बोलावं हे त्याचा विवेक ठरवत असतो आपण ते ठरवू शकत नाही.**

त्याच बोलणं आपल्या अखत्यारीत नाही पण तो जे बोलला आहे त्या पैकी काय स्वीकारलं पाहिजे अथवा आपण काय स्वीकारायचं हे तर आपण नक्कीच ठरवू शकतो.महणून आपण ते बोलण न स्वीकारता दुर्लक्ष केलं पाहिजे.पण असं होतं नाही त्याच्या बोलण्याकड आपण इतकं लक्ष का देतो तर आपला विवेक जागृत नसतो.म्हणून आपण इतकं गांभीर्याने याकडे पाहतो.आणि नको ते दुःख जीवनात ओढावून घेतो.इतरांच्या मताचा अथवा बोलणयाचा आपल्यावर आपण इतका परिणाम करुन घेणं म्हणजे आपण स्वतः आपल्या पायावर दगड पाडून घेतल्या सारख आहे.इतरांची मतं हि त्यांच्या सामर्थ्य नुसार असतात मग त्या विषयावरून आपण स्वतःला दुःखी कारण उचित ठरणार नाही. इतरांच्या मताचा परिणाम होऊ देयचा नसेल तर आपला विवेक सदैव जागृत असला पाहिजे.दैनंदिन जीवनात अनेक लोकांशी आपला संपर्क येतो.आणि संवाद पण होतो संवादातील अनेक शब्द वाक्य आपल्या डोक्यात घुमतात आणि आपली स्थिरता बिघडवतात पण आपण सचेत असलं पाहिजे बोलणारा त्याच्या बौद्धिक क्षमतेनुसार बोलत असतो आपण ते स्वीकारलं पाहिजे असं आपल्यावर बंधनं नसतं मग त्याच बोलण आपण स्वीकारण्याच काही करणं नाही.आशात आपला विवेक जागृत असला पाहिजे.जेणेकरून आपण डिस्टर्ब होणार नाहीत. जीवनातील तणावाचं मुख्य कारण इतरांकडून आपल्या संदर्भात झालेलं वक्तव्य अथवा मत आपण एवढं मनावर घेतो कि आपण दुसर्याच्या मतांबद्दल स्वतःला त्रास करून घेतो.हा तणाव फक्त आपलं मानसिक शारिरीक वैचारिकच नुकसान करत नाही तर कधी कधी हा तणाव टोकाला जाऊन आपलं प्रचंड नुकसान मोठं करतो.आपण फक्त पाहत राहतो.व नुकसान होऊ देतो.मुळात आपण हे नुकसान होऊ देता कामा नये.दैनंदिन जीवनात आपला कळतं न कळत कित्येकांशी प्रत्यक्ष अ प्रत्यक्ष पणे संपर्क येणारच अनेक कार्य पार पाडण हे जीवन क्रमाचा भाग असल्याने संबंध येणार नाही असं होण शक्य नाही.याच दरम्यान बोलण्यातून अथवा व्यवहारातुन अनेकदा सहज अथवा जाणिव पुर्वक अशा कारणांमुळे काही शब्दांची देवाण घेवाण होते असते.ज्याची आपण कल्पना देखील करू शकत नाही. साध्याची सामाजिक संस्कृती परस्थिती हि दिवसेंदिवस बिघडत चालली आहे.आपण स्वतः ला वजा करून इतरा बदल मत नोंदविण्याची पद्धत बदलत चालली आहे.इतरांशी बोलताना सामाजिक सौजन्य संपुष्टात येत चालले आहे.अस होत असताना त्याचे परिणाम देखील आपल्या स्वस्थावर होत आहेत.आरेला कारे म्हणत कोण किती टोकाच बोलु शकतो हि जणुकाही स्पर्धा लागली आहे. संयम हा अद्भुत गुण फार फार दुर्मिळ झाला आहे. सामाजिक संस्कृती हि वैचारिक दिवाळखोरी कडे मार्गक्रमण करत आहे. असंच काहीसं सचित्र निर्माण झालं आहे.देणारा हा आपल्याला कुवतीनुसार फुल,काटे,दगड शिव्या शाप दुषण,विचार अविचार,जे काही त्याच्या मध्ये ठासुन भरलेल आहे ते सद्सद्विवेक बुद्धी नुसार देत असतो.देणे हा त्याचा धर्म आहे.पण घेणे हा आपला धर्म नाही. आपण ते स्वीकारलंच पाहिजे असं काही आपल्यावर बंधनं नाही.मग आपण कशासाठी त्यावर उतावीळ असतो . आपल्याला इतरांकडून जे काही मिळालं ते स्वीकारताना आपला विवेक जागृत असला पाहिजे तो जागृत असेल तर मग इतरांकडून आपणांस चांगलं वाईट काहि हि मिळालं तरी त्यातील योग्य तेच आपण स्वीकारणार एवढं मात्र निश्चित.देणारा आपल्याला स्वीकारण्याच बंधनं घालू शकत नाही हिच आपल्या विवेकाची ताकद आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - बाजीराव श्रीराम खांदवे, अहमदनगर कार्यालय - तिसरा मजला, खरेदी विक्री संघाची जुनी इमारत, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहमदनगर ४१४००१, फोन ९८२२१०७६५०. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * Executive Editor - Bajirao Shriram Khandave. Ahmednagar office - third floor, kharedi - vikri sangh old building, Market yard Station Road, Ahmednagar 414001. Phone 9822107650.(* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# शिक्षकांमध्ये असलेल्या कलागुणांना वाव मिळवून देण्यासाठी क्रीडा व कला महोत्सव : कुलगुरू डॉ. बोकारे

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** विद्यार्थ्यांप्रमाणेच शिक्षकांमध्ये देखील कला व खेळाप्रती आवड असते. ही आवड व छंद जोपासणे, शिक्षकांमध्ये खेळ आणि कलेप्रती उत्साह निर्माण करणे व त्यांच्यामधील कलागुणांना वाव मिळवून देण्यासाठी शिक्षक क्रीडा व कला महोत्सव हे एक प्रकारचे व्यासपीठ असल्याचे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे म्हणाले. गोंडवाना विद्यापीठ परिसरात दोन दिवसीय शिक्षक क्रीडा व कला महोत्सव (कलादर्पण-2024) चे आयोजन करण्यात आले होते. सदर



महोत्सवाच्या उद्घाटनाप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाला गोंडवाना विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. श्रीराम कावळे, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. अनिल चिताडे,शारिरीक शिक्षण व क्रीडा विभागाच्या संचालक डॉ. अनिता लोखंडे तसेच नागपूर, हार्मोनि इव्हेंटचे संचालक राजेश समर्थ, सुप्रसिद्ध गायक प्रफुल सांगोळे आणि कलर्स उपविजेती, स्वर्ण स्वर भारत, इंडियन आयडल फेम स्वस्तिका ठाकूर आदी उपस्थित होते.

पुढे बोलतांना कुलगुरू डॉ. बोकारे म्हणाले, सर्वप्रथम सन-2022 मध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी अमृत कला व क्रीडा महोत्सवाचे आयोजन विद्यापीठामार्फत करण्यात आले होते आणि ते शिस्तबद्ध पद्धतीने यशस्वी देखील झाले. सदर महोत्सव यशस्वी करण्यामागे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे महत्त्वाचे योगदान आहे. गोंडवाना विद्यापीठ हे महाराष्ट्रातील एकमेव असे विद्यापीठ आहे, ज्या ठिकाणी वर्षभरात विविध कार्यक्रम व नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले जातात. विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयांनी देखील असे उपक्रम राबवावेत. या कला व क्रीडा महोत्सवाच्या माध्यमातून शिक्षकांमध्ये उत्साह व नवचेतना निर्माण होईल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. कार्यक्रमाला विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील प्राध्यापकांची उपस्थिती होती.

## काव्य-चरितावली

आधुनिक केसरी

पुष्प ७०वे

वामनराव नामे एक साधक ।
करी चर्चा साधक- बाधक ।
श्री महाराजांना विचारी एक ।
अर्थ ज्ञानेश्वरी ओवीचा ।।१।।
त्या समय महाराज होते रागात ।
गुंतले होते ते भांडणात ।
चाले भांडण जोरात।
वामनराव मुद्दाम विचारी त्याचा प्रश्न।।२।।
जेथे काम उपजला ।
तेथ क्रोध आधीचि आला ।
क्रोधी असे ठेविला । संमोहू जाणे ।। ३ ।।
प्रश्न त्याचा महाराजांनी ऐकला
। राग त्यांनी शांत ठेवला ।
बोले वामनरावाला । हे सोंग रागाचे उतरू दे।
मग बोलतो तुला ।। ४।।
भांडण ते मिटले ।
श्री महाराज भाऊबंदास प्रेमे बोलले ।
प्रसाद देऊनी पाठवले । त्याला ।। ५।।
मग, वामनरावा अर्थ सांगितला ।
म्हणती, विकार " भगवंताने दिला । विकारांवर
सत्ता ठेवणे जो शिकला ।
विकारांची सत्ता त्यावरती ना चाले ।। ६ ।।



अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

# महाडच्या क्रांतिभूमीत बाबासाहेबांना अभिवादन

## बाबासाहेबांच्या चवदार तळ्याच्या त्या संघर्षाचे स्मरण

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी २० मार्च १९२७ साली डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी महाड येथे चवदार तळ्याचा सत्याग्रह केला. समाजापासून दूर फेकलेल्या माणसांना सुद्धा पाणी घेण्याचा अधिकार मिळावा. म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी महाडच्या चवदार तळ्यावर ऐतिहासिक अशी क्रांती केली.२० मार्च १९२७ साली हेच चवदार तळे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी संघर्ष करून खुले केले.याच दिनाचा वर्धापन दिन दरवर्षी मोठ्या उत्साहात साजरा केला जात असतो.महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील भीम अनुयायी हे महाड येथे १९ आणि २० मार्च या दोन दिवशी दाखल होत असतात.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या त्या संघर्षाचे स्मरण करित त्यांना अभिवादन करत असतात.यावर्षी देखील बहुसंख्येने भीम अनुयायांनी महाडमध्ये येत चवदार तळ्यास भेट दिली.तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यात आले.यावेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा विजय असो,एकच साहेब बाबासाहेब तसेच जय भीम,जय भीमचा जयघोष करण्यात आला.डोक्यावर निळी टोपी,हातात पंचशील ध्वज आणि अशोक चक्रांकित निळा ध्वज घेत महाडमधील वातावरण जल्लोषमय असेच झाले होते.पांढरे शुभ्र वस्त्र परिधान केलेले बौद्ध उपासक आणि उपासिका यांच्या कडून शिस्तबद्ध पद्धतीने अन एका रांगेतून बाबासाहेबांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यात आले. विविध सामाजिक आणि राजकीय संघटनांच्या वतीने विविध प्रबोधनात्मक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि तथागत गौतम बुद्ध यांच्या कार्यावर आधारित विविध गाणी सादर करण्यात आली.विशेष म्हणजे विविध पुस्तकांची स्टॉल लावण्यात आलेली होती. आंबेडकरी अनुयायांनी विविध पुस्तके खरेदी केली.समतेचा संदेश देण्यासाठी या दिनाचे औचित्य साधून" शिवराय ते भिमराय "अशी समता रॅली सुद्धा काढण्यात आली.



बार्टी यांच्या विशेष आयोजनातून डॉ.बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारकात अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.लेखक दिग्दर्शक प्रकाशकुमार वाघमारे यांनी दिग्दर्शित केलेले "भीमा तुझ्या जन्मामुळे" हे महानाट्य सादर करण्यात आले.यावेळी महाडच्या चवदार तळ्याच्या संघर्षासोबतच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या संपूर्ण कार्याचा जीवनप्रवास या महानाट्य द्वारे दाखविण्यात आला.यावेळी संपूर्ण नाट्य गृह भीम अनुयायांच्या उपस्थितीने भरून गेले होते.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनातील व रमाई सोबत च्या संसारातील काही क्षण दाखवीत असताना अनेकांच्या डोळ्यातून अश्रू आले.एक खडतर प्रवास दाखविण्यात आला. तसेच याच नाट्य गृहातून 'कांबळेची वरात, कुलकर्णीच्या दारात"हे नाट्य सुद्धा यावेळी आयोजित करण्यात आले होते. महाड मध्ये आलेल्या लोकांची गैरसोय होऊ नये म्हणून प्रशासनाकडुन विशेष काळजी घेण्यात आली होती.पोलीस प्रशासनासोबतच समता सैनिक दलाचे सैनिक सुद्धा ठिक ठिकाणी तैनात होते. शिस्तबद्ध पद्धतीने अभिवादन कार्य पार पडावे.म्हणून समता सैनिक दलाकडून सुद्धा सुचना करण्यात येत होत्या.उन्हापासून संरक्षण व्हावे.त्यादृष्टीने सुद्धा नियोजन करण्यात आले होते.पिण्याच्या पाण्याच्या व्यवस्था तसेच विविध संस्थांकडुन भोजन व्यवस्था करण्यात आली होती.राज्याच्या विविध कानाकोपऱ्यातून आलेल्या भीम अनुयायांच्या गर्दीने महाड अगदी आंबेडकरमय झाले होते.वरंद घाटातून महाडच्या दिशेने जाणाऱ्या भीम अनुयायांना विशेष भोजनाचे आयोजन हे घाट सुरू होण्यापूर्वी आंगसुळे,आपटी ता.भोर या परिसरात बौद्ध जन संघ भोर तालुका यांच्या वतीने करण्यात आले होते.या ठिकाणी सुद्धा भीम अनुयायांनी थांबत भोजनाचा आस्वाद घेतला.यावेळी फलटण तालुक्यातून तरडगाव आणि खंडाळा तालुक्यातून आलेल्या बौद्ध बांधवांनी या ठिकाणी थांबत तथागत गौतम बुद्ध,छत्रपती शिवाजी महाराज,डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले.भोजन दान नियोजना बद्दल आलेल्या भीम अनुयायांनी आयोजकांचे विशेष कौतूक केले.

# नवनीत राणा यांच्या भाजप प्रवेशाचे संकेत

आधुनिक केसरी न्यूज



**अमरावती :** वर्धा आणि अकोला येथील कार्यक्रमांना उपस्थित राहण्यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचे बुधवारी दुपारी येथील बेलोरा विमानतळावर आगमन झाले. आमदार रवी राणा यांनी विमानतळावर पोहचून त्यांचे स्वागत केले. देवेंद्र फडणवीस, चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासोबत रवी राणांनी सुमारे दहा मिनिटे चर्चा केली. खासदार नवनीत राणा यांच्या भाजप प्रवेशाची उत्सुकता ताणली गेली असताना या भेटीला महत्व प्राप्त झाले आहे. दोन्ही नेत्यांचे दुपारी २ वाजता बेलोरा विमानतळावर आगमन झाले आणि त्यानंतर ते पुढील प्रवासासाठी रवाना झाले. यासंदर्भात प्रतिक्रिया जाणून घेतली असता आमदार रवी राणा म्हणाले, देवेंद्र फडणवीस आणि चंद्रशेखर बावनकुळे हे दोन्ही नेते वर्धा आणि अकोला येथील कार्यक्रमांना उपस्थित राहण्यासाठी जाणार होते. त्यांचे विमान बेलोरा विमानतळावर उतरले. आपण दोन्ही नेत्यांच्या स्वागतासाठी गेलो. त्यांचे मी नेहमीच स्वागत करतो. यावेळी राजकीय चर्चा झाली नाही. नवनीत राणा यांच्या भाजप प्रवेशाचे संकेत मिळाले आहेत का, असे विचारले असता रवी राणा म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह हे नवनीत राणा यांच्या संसदेतील कामगिरीविषयी समाधानी आहेत. देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत गेल्या १३ वर्षांपासून आपण काम करीत आहोत. त्यांनी आम्हाला नेहमीच पाठिंबा दिला आहे. नवनीत राणा यांच्या उमेदवारीविषयी सकारात्मक संकेत मिळाले आहेत, असे आपण यापूर्वीही सांगितले आहे. देवेंद्र फडणवीस जो काही आदेश देतील, त्याचे पालन आपण करणार आहोत. बेलोरा विमानतळावर स्वागतासाठी युवा स्वाभिमान पक्षाचे राष्ट्रीय सचिव जयंतराव वानखडे देखील उपस्थित होते. एक-दोन दिवसांत नवनीत राणा यांच्या उमेदवारीची घोषणा होईल, असा दावा त्यांनी केला.

# शाश्वत उपजीविकेची कास!

आधुनिक केसरी

आपल्या दृष्टीआड असलेल्या सृष्टीचे महत्त्व मानवाला न समजण्याचे हे अगदी स्पष्ट उदाहरण म्हणता येईल. शुध्द हवा, पिण्याचे पाणी आणि इतरही अनेक बाबी आपल्याला मिळतात, ते या वनांमुळेच! मात्र चंगळवादी जीवनशैलीसाठी केल्या जाणाऱ्या बेसुमार जंगल तोडीमुळे निसर्गाचा समतोल ढासळत चालला आहे, हे सन १९७०च्या दशकापासूनच जाणवू लागले. त्यातून जंगले वाचवण्याची संकल्पना पुढे आली. संयुक्त संघाच्या अन्न व शेती संघटनेच्या सदस्य देशांनी हा वर्ल्ड फॉरेस्ट डे-आंतरराष्ट्रीय वन दिन दि.२१ मार्च २०१२पासून साजरा करण्यास सुरुवात केली. श्रीकृष्णदास (बापू) निरंकारी यांच्या लेखणीतून वनमहात्म्य विशद..



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आपण "दृष्टीआड सृष्टी!" असे नेहमीच ऐकत असतो. पण या सृष्टीच्या आड असे काय आहे? जे आपल्याला दृश्य नाही, दिसत नाही. अशा कितीतरी गोष्टी या सृष्टीची चक्रे फिरवत असतात. यामध्ये दगड, माती, हवा, पाणी असे निर्जीव घटक आहेत. त्याचप्रमाणे झाडे-किडे, माणूस-प्राणी, साप-मासे असे विविध सजीवही आहेत. या सर्वांच्या अनुकूल-प्रतिकूल ससंबंधाने शतकानुशतके पृथ्वीचा इतिहास लिहीला जात आहे. या सर्व सजीव-निर्जीव गोष्टींचा प्रभाव एकमेकांवर पडत असतो. त्याचप्रमाणे यांच्या पूरक वापराने एकूणच जीवसृष्टीचे संवर्धनही होत असते. माणूस हा निसर्गाचा वैरी नसून त्याच्याच मदतीने निसर्गाचे जतन व संवर्धन होऊ शकते. जंगलांतून मिळणाऱ्या संसाधनांचा मनुष्याच्या उपजीविकेशी थेट संबंध आहे. इ.स.२००२ साली जंगल संवर्धनासाठी जैवविविधता कायदा मंजूर झाला. सामुहिक वनहक्क कायदा आला. कारण शासनच मोठाली झाडे तोडून उत्पन्न लाभ घेत असे आणि शेतकरी व सामान्य जनतेला वेठीस धरत असे, अटकाव करत असे. म्हणून शेतकरी व आदिवासी बांधवांनी याविरुद्ध दंड थोपटून आवाज उठविला. आदिवासी बांधवांनी तर "नावा नाटे; मावा राज!" म्हणत संघर्ष केला. त्यामुळेच त्यांचे व इतर परंपरेने राहणाऱ्या आणि जंगलांचे संवर्धन करणाऱ्या वननिवासी यांच्या जंगलावरील हक्कांना मंजूरी देण्यात आली. याच कायद्यांचा व इतर शासकीय योजनांचा आधार घेत गावांमध्ये बदल घडू लागले आहेत. याची काही उदाहरणे- आदिवासी भागात सामुहिक वनहक्क मिळालेला गडचिरोली जिल्हा म्हणून नाव ऐकले असालच. येथील एकूण १०२५ गावांनी जैवविविधता समित्या स्थापन केल्या. त्यात मोठ्या प्रमाणात जंगल संवर्धनाला सुरूवात केली आहे. यातूनच लोकांच्या उपजीविकेचा प्रश्नही सुटत आहे. सन २००५ला आलेल्या या कायद्यानुसार जंगलांतील बांबू, तेंदूपत्ता या सर्वांचे मालकी हक्क ग्रामसभेला मिळाले. बांबूसारख्या वनोपजाची व्यवस्था लोकांनीच केली. यातून बांबूकटाई साठीची मजुरी आधीपेक्षा तिप्पट प्रमाणात लोकांना मिळू लागली, शिवाय या बांबूविक्रीतून गावासाठी आवश्यक विकासकामांस लोकांना पैसे मिळाले. कोरची तालुक्यात सालेम, झेंडेपार, अरवीटोला, अंधेरी, टेंभली, काळेगाव तर धानोरा तालुक्यातील लेखा- मेंढा या गावातील लोकांनी सात एकरात नवीन बांबूची लागवड केली आहे. जे जंगल त्यांना जगवते, त्या जंगलाला ते जगवत आहेत, वाढवत आहेत. धुळे जिल्ह्यातील बारीपाडा या गावात काही वर्षांपूर्वी वनव्यवस्थापन समिती स्थापन झाली. उजाडलेल्या जंगलाचे संवर्धन झाले. त्यांत चराईबंदी, कुऱ्हाडबंदी वगैरे करण्याचे लोकांनीच ठरविले. वनांतील सर्व झाडांची मोजणी झाली. मोह या उत्पन्न मिळवून देणाऱ्या झाडांचा लिलाव होऊ लागला, ते उत्पन्न गावातील लोकच घेऊ लागले. त्यातून गावात विकासकामे झाली. जंगल वाढीसह भूगर्भातील पाण्याची पातळीही वाढली. उत्तम शेती होऊ लागली; गाव समृद्ध बनत गेले. आणखी उदाहरण धुळे जिल्ह्यातीलच लामकानी गावाचे आहे. शहरात राहणाऱ्या डॉक्टर धनंजय नेवाडकर यांना झालेल्या अपघातामुळे ते काही महिने सक्तीची विश्रांती घेण्यासाठी गावी आले. त्यावेळी लोकांपुढे गुरांचा चारा दुर्मिळ आणि विहिरीचे पाणी आटण्याची मोठी समस्या आहे, असे त्यांच्या लक्षात आले. गावाच्या बाजूलाच सातपुड्याची पर्वतरांग आहे. साधारण एक हजार एकरांचा हा डोंगर सुजलाम-सुफलाम करण्याचे त्यांनी ठरविले. त्यासाठी रोजगार हमी योजनेचा आधार घेतला. पाणी अडवा; पाणी जिरवा, ही कामे तेथे सुरु केली. गावातील लोकांना रोजगार हमी योजनेचा फायदा व रोजगार मिळाला. त्यातून गावातील गुरांच्या चाऱ्याची व पाण्याची समस्या मिटली, का? तर डोंगर पुन्हा समृद्ध बनला आहे. कोरोना काळातील मागील तीन वर्षांपासून वन्यपशुंचा मानवी वस्त्यांवर हल्ला होत आहे. जनतेचा नाहक बळी जाऊन त्यांची शिकार ठरत आहे, मात्र वन प्रशासन अजूनही कुंभकर्णी झोपेत आहे. वेळीच बंदोबस्त झाला नसल्याने जनता वन प्रशासनास सहकार्य न करण्याच्या पावित्र्यात उभी ठाकली आहे. त्यामुळे शासनाला जबर नुकसानीचा फटका बसू शकतो. म्हणून सकारात्मक पाऊल उचलण्यासाठी व जंगलाचे महत्त्व सर्वांना पटावे म्हणून शासन आणि विविध संस्था यांनी तत्सम नानाविध कार्यक्रम राबवावेत- अनावश्यक जंगलतोड टाळणे, अधिक झाडे लावणे, मनुष्य वस्त्यातील वन्यपशुंच्या हल्ल्यात जीवितहानी होऊ नये, यासाठी प्रशासनाने दक्ष राहणे, जंगलांपासून मिळणारी उत्पादने आणि होणारे फायदे जाणणे इत्यादी जंगलांना सतत भेट देवून माहिती मिळविणे, आदींचा समावेश असतो. जंगलांबाबत आस्था आणि जंगलतोडीमुळे होणाऱ्या हवामानातील बदलांबद्दल काहींना चिंता वाटते. अशा सर्वांना जागतिक पातळीवर व्यासपीठ मिळावे, हा देखील वनदिन साजरा करण्यामागचा उद्देश आहे. बदलत्या हवामानावर भविष्यात उपाययोजना करताना आणि धोरण आखताना जंगलांबाबत योग्य विचार होत असल्याची खात्री या मंचावरून एकत्रितपणे करता येईल. जसे वनांवरील हक्क लोकांना मिळत आहे, तसेच जंगल संवर्धन आणि जतन करण्याची जबाबदारीही लोकांकडे आहे. ज्या भागांत वनव्यवस्थापन समिती नाही किंवा नुसतीच कागदोपत्री आहे, अशा काही गावांतून लोकांना पर्यटनाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होत आहे, मात्र बेजबाबदारपणामुळे त्यावर नियंत्रण नाही. यातून जंगलांचा विनाशच जास्त होत आहे व नको त्या वाईट प्रवृत्ती बोकाळत आहेत. यासाठी संतुलित, शाश्वत, जबाबदार लोकसहभागातून होणाऱ्या वन व्यवस्थापनातूनच शाश्वत उपजीविका निर्माण होईल. सोबतच सर्वांनाच शुद्ध हवा आणि शुद्ध आरोग्य अनुभवता येईल, यात यत्किंचितही शंका नाही! !!

# स्वातंत्र्यवीरांचे दर्शन आणि आदरणीय मोदीजींचा आदेश!

## सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितला भावनिक प्रसंग

आधुनिक केसरी न्यूज





**चंद्रपूर :** मार्चला अंदमान-निकोबारला गेलो. स्वातंत्र्यवीर सावरकरांना ज्या कोठडीत ठेवलं होतं त्या दर्शनासाठी गेलो होतो. तेव्हाच माझा सहकारी धावत आला आणि म्हणाला, 'भाऊ, तुमचे तिकीट घोषीत झाले'. योगायोग कसा असतो हे मी अनुभवतो आहे. एकीकडे स्वातंत्र्यवीरांचे दर्शन आणि दुसरीकडे देशगौरव पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांचा आदेश होता, असा भावनिक प्रसंग सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितला.

चंद्रपूर-वणी-आर्णी लोकसभा मतदारसंघाची उमेदवारी जाहीर झाल्यानंतर ना. श्री. सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रथम चंद्रपूर आगमनानिमित्त जंगी स्वागत करण्यात आले. गांधी चौकात झालेल्या सभेत सुधीर मुनगंटीवार यांनी चंद्रपूरकरांशी संवाद साधला. ते म्हणाले, '१३ मार्चला पक्षाने मला अंदमान-निकोबारला पक्षाचा लोकसभा प्रभारी म्हणून दोन दिवसांच्या प्रवासासाठी पाठवले. ११ तारखेला देशनायक नरेंद्र मोदी आणि अमितभाईंनी मला 'लोकसभा लढनी होगी' असा आदेश दिला. मनामध्ये द्वंद्व होते. ३० वर्षे महाराष्ट्राची सेवा केली. महाराष्ट्राच्या कोणत्याही जिल्ह्याचा लोकप्रतिनिधी जेव्हा माझ्याकडे यायचा, मी पूर्ण शक्तीने मदत करायचो. मी कधी जात, धर्म, वंश आणि पक्षाचाही भेद केला नाही. काँग्रेसच्या नेत्याने माझ्यावर टिकाही केली असेल, पण संकट आले तेव्हा त्याचीही मदत केली. 'अगर कोई हमदर्द समझकर मेरे कार्यालय में आता है, तो मैं जीवन में कभी उसे सिर दर्द नहीं समझूंगा, असेही ना. श्री. मुनगंटीवार म्हणाले.

'ज्या स्वातंत्र्यवीर सावरकरांनी, शहिदे आझम भगतसिंगांनी या देशाच्या स्वातंत्र्याचा झेंडा देशाच्या जनतेच्या हातात दिला. आता चंद्रपूर, वणी, आर्णी लोकसभेचा आवाज त्या नवीन संसद भवनामध्ये बुलंद करण्याची जबाबदारी माझ्यावर आहे,' अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या. मी अनेक वर्षांपासून भाषण देतोय. चंद्रपूरच्या गांधी चौकापासून मुंबईच्या आझाद मैदानापर्यंत आणि पुढे दिल्लीतील संसद भवनात झालेल्या शिबिरातही भाषण केले आहे. पण आज मात्र माझे शब्द जड होत आहेत. कारण निवडणुक जिंकण्यापूर्वीच एवढे जल्लोषात स्वागत होत आहे, अशा भावना ना. श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केल्या. दुपारी बारा वाजता नागपूर विमानतळावर पोहोचलो आणि नागपूर ते चंद्रपूर अवघे दोन तासांचे अंतर पूर्ण करायला मला ९ तास लागले. जनतेचे, कार्यकर्त्यांचे प्रेम बघून भारावलो आहे, या शब्दांत व्यक्त होतानाच हिंदू, मुस्लीम, शिख, बौद्ध, ख्रिश्चन अशा सर्व धर्माचे प्रतिनिधी व्यासपीठावर आलेले बघून आयुष्यातील खरा आनंद अनुभवतोय, असेही ते म्हणाले.




# पीरबावडा येथे यात्रेनिमित्त शांतता कमिटीची बैठक; पोलीस निरीक्षक इंगळे यांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील पीरबावडा येथे बकरी चोर पकडल्यामुळे वड़ोद बाजार पोलिस ठाण्याचे कर्मचारी यांचा पिरबावडा ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला. पिरबावडा ता.फुलंब्री येथून ता.6 मार्च रोजी येथील शेतकरी अब्दुल रहेमान अली बाजामान यांच्या 35 शेळ्या व 10 बोकड चोरट्यांनी चोरुन नेले होते.व या बाबतचोराविरुद्ध पोलिस ठाणे वड़ोद बाजार येथे गुन्हा नोंद करण्यात आला होता.त्या अनुषंगाने सहायक पोलिस निरिक्षक सुनिल इंगळे व सहकारी यांनी तीनच दिवसात या बकरी चोर टोळीचा पर्दा फाश करीत आरोपी व शेळ्या नांदेड़ जिल्ह्यातून जप्त करुन येथील शेतक-याला त्यांच्या शेळ्या व बोकड परत मिळवून दिल्या होत्या.त्यामूळे पिरबावडा ग्रामस्थांच्या वतीने या कर्मचा-यांचा सत्कार ठेवण्यात आला होता. दरम्यान येथे शहामिया बाबा च्या होणार्या यात्रेनिमीत्त शांतता कमिटीची बैठक घेऊन यात्रेमधे कोणीही कायदा हातात न घेता यात्रा शांततेत साजरी करण्याचे आवाहन इंगळे यांनी केले. त्यावेळी सहायक पोलिस निरिक्षक सुनिल इंगळे, बीट अंमलदार दत्तात्रय मोरे,निवृत्ती मदने,शिवनाथ दराडे, सरपंच डॉ.सारंग गाडेकर,तंटामुक्त समिती अध्यक्ष भगवान गाडेकर,यात्रा कमिटी अध्यक्ष नाजिम मुलतानी,ग्रामपंचायत सदस्य कृष्णा गाडेकर,नारायण बकाल, कचरु गाडेकर,शिवनाथ गाडेकर, काकाजी लहाने, पत्रकार बाबासाहेब ठोंबरे ,अमोल कोलते उपस्थित होते.

# 85 वर्षांपेक्षा जास्त व दिव्यांग मतदारांना आता गृह मतदानाची सोय

आधुनिक केसरी न्यूज



**चंद्रपूर :** भारत निवडणूक आयोगाच्या सुचनेनुसार 85 वर्षे व त्यापेक्षा जास्त वय असणा-या मतदारांना तसेच 40 टक्क्यांपेक्षा जास्त अपंगत्व असलेल्या दिव्यांग मतदारांना गृह मतदानाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या सुविधेचा लाभ घेण्याकरीता संबंधित मतदारांना आवश्यक असलेल्या 12 डी नमुन्याचे वाटप सुरू झाले असून सदर नमुना परिपूर्ण भरून संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी / सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे सादर करणे आवश्यक आहे. 85 वर्षे व त्यावरील वय असणारे तसेच 40 टक्क्यांपेक्षा जास्त अपंगत्व असलेल्या दिव्यांग मतदारांनी मागणी केल्यास त्यांना घरपोच पोस्टल बॅलेटद्वारे मतदान करता येणार आहे. त्यासाठी नमुना 12 डी केंद्र अधिका-यांमार्फत भरून मतदानाची प्रक्रिया पार पाडण्यात येईल. 85 व त्यापेक्षा जास्त वय असलेले मतदार : 13- चंद्रपूर लोकसभा मतदार संघात एकूण 16621 मतदारांचे वय 85 किंवा त्यापेक्षा जास्त आहे. यात पुरुष मतदारांची संख्या 7117 तर स्त्री मतदारांची संख्या 9504 आहे. राजुरा विधानसभा मतदारसंघात असे एकूण मतदार 2754 (पुरुष – 1163, स्त्री - 1591), चंद्रपूर मतदार संघात 2380 (पुरुष – 1100, स्त्री - 1280), बल्लारपूर मतदार संघात 2246 (पुरुष – 892, स्त्री - 1354), वरोरा मतदार संघात 2878 (पुरुष – 1356, स्त्री - 1522), वणी मतदार संघात 2846 (पुरुष – 1225, स्त्री - 1621, आणि आर्णी विधानसभा मतदार संघात 3517 (पुरुष – 1381, स्त्री - 2136) मतदारांचे वय 85 किंवा त्यापेक्षा जास्त आहे. तर गडचिरोली लोकसभा मतदार संघातील ब्रम्हपूरी विधानसभा मतदार संघात 85 किंवा त्यापेक्षा अधिक वय असलेल्या मतदारांची संख्या 2403 (पुरुष – 921, स्त्री - 1482) आणि चिमूर मतदार संघात 2594 (पुरुष – 996, स्त्री - 1598) मतदार आहेत.

असे आहेत दिव्यांग मतदार : चंद्रपूर लोकसभा मतदार संघात एकूण दिव्यांग मतदारांची संख्या 9679 आहे. यात 6164 पुरुष तर 3515 स्त्री मतदारांचा समावेश आहे. यापैकी राजुरा मतदार संघात 1233 दिव्यांग मतदार (पुरुष – 781, स्त्री - 452), चंद्रपूर मतदार संघात 913 दिव्यांग मतदार (पुरुष – 591, स्त्री - 322), बल्लारपूर मतदार संघात 1842 दिव्यांग मतदार (पुरुष – 1195, स्त्री - 647), वरोरा मतदार संघात 1551 दिव्यांग मतदार (पुरुष – 1021, स्त्री - 530), वणी मतदार संघात 1679 दिव्यांग मतदार (पुरुष – 1035, स्त्री - 644), आर्णी मतदार संघात 2461 दिव्यांग मतदार (पुरुष – 1541, स्त्री - 920) आहेत.

तर गडचिरोली लोकसभा मतदार संघातील ब्रम्हपूरी विधानसभा मतदार संघात दिव्यांग मतदारांची संख्या 1138 (पुरुष – 774, स्त्री - 364) आणि चिमूर मतदार संघात 1096 (पुरुष – 681, स्त्री - 415) मतदार आहेत.

# श्री महाकाली माता महोत्सव समितीच्या वतीने महाकाली मंदिरात भजनाचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज



**चंद्रपूर :** श्री महाकाली माता महोत्सव समीतीच्या वतीने महाकाली मंदिर येथे महाआरती, भजन व महाप्रसाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी श्री महाकाली माता महोत्सव समीतीचे सचिव अजय जयसवाल यांना महाआरतीचा मान मिळाला. त्यांनी सपत्निक माता महाकालीची आरती केली. यावेळी श्री माता महाकाली महोत्सव समीतीचे अध्यक्ष आमदार किशोर जोरगेवार, कल्याणी किशोर जोरगेवार, उपाध्यक्ष अ‍ॅड. विजय मोगरे, कोषाध्यक्ष पवन सराफ, विश्वस्त मिलिंद गंपावार, सुनिल महाकाले, राजेश शास्त्रकार,श्याम धोपटे, मधुसुदन रुंगठा, विलास मसराम, यंग चांदा ब्रिगेडच्या महिला शहर संघटिका वंदना हातगावकर, दुर्गा वैरागडे, युवा नेते अमोल शेंडे, कार्तिक बोरेवार, शंकर दंतुलवार, आशा देशमूख, अनिता झाडे, वैशाली मद्दीवार, रोडमल गहलोत, प्रा. श्याम हेडाऊ, वैशाली मेश्राम, अल्का मेश्राम, अस्मिता दोनारकर, अनिता झाडे, माधूरी बावणे यांच्यासह महोत्सव समितीच्या पदाधिका-यांची उपस्थिती होती.

चंद्रपूरची आराध्य दैवत माता महाकाली ची महती संपूर्ण राज्यभरात पोहचावी पर्यायाने येथील पर्यटनाला चालना मिळावी या उद्देशाने चंद्रपूर येथे श्री माता महाकाली महोत्सवाला सुरवात करण्यात आली आहे. यंदा सदर महोत्सवाच्या दुस-या वर्षीही माता महाकालीच्या भक्तांचा मोठा सहभाग लाभला. आता श्री महाकाली माता महोत्सव समितीच्या वतीने वर्षभर विविध धार्मिक आणि सामाजिक कार्यक्रम घेण्याचा निर्णय घेतला आहे. सदर नियोजनानुसार महिण्यातून एकदा माता महाकाली मंदिर येथे, महाआरती, भजन आणि महाप्रसादाचे आयोजन करण्याचे नियोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे. दरम्यान मंगळवारी येथे महाआरती, भजन आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बाबूपेठ येथील ज्ञान विकास भजन मंडळाच्या संचाने भजन सादर केले. त्यामुळे परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते. यावेळी श्री महाकाली माता महोत्सव समीतीचे सचिव अजय जयसवाल यांनी सहपरिवार श्री माता महाकालीची आरती केली. यावेळी जयसवाल परिवारा तर्फे महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी शेकडो नागरिकांनी महाप्रसाद कार्यक्रमाचा लाभ घेतला.

# बहुगुणी पळस फुलांनी निसर्ग सजला



आधुनिक केसरी न्यूज

**विनोद पाटील बोडखे**

**रिसोड :** वसंत ऋतुमध्ये हिंदू धर्मियांच्या महत्वाचा सण म्हणजे होळी देशभर साजरा केला जातो. धुलीवंदनाला एकमेकांना रंग लावून स्नेह द्विगुणित करून आनंदोत्सव साजरा करण्याची प्रथा आहे. वसंत ऋतूमध्ये रिसोड तालुक्यातील लोणी बू परिसरात लोणार लोणी ते रिसोड या राज्य मार्गावर पळस फुलांनी बहरलेले अनेक झाडे दिसून येत आहे.

पळस या झाडाला आयुर्वेदामध्ये अनन्य साधारण महत्व आहे.पळसाची झाडे ही वेडी वाकडी आणि फारसी उंच नसतात त्यातच या झाडाची साल ही खरबडीत आणि राखांडी रंगाची असली तरीही पळसाची फुले मात्र माणसाचे मन मोहित करून घेतात.कोणाचीही नजर पळसाच्या रंगीबेरंगी फुलावर पडताच प्रत्येकाला आपलेसे वाटते. पळसाची रंगी बेरंगी फुले अंघोळीच्या पाण्यात टाकून अंघोळ केल्यास त्वचारोग नाहीसा होतो. तसेच पळस झाडाच्या बियाचाही औषधी म्हणून उपयोग केला जातो. एकीकडे वृक्ष वल्ली आम्हा सोयरे या संत तुकाराम महाराजांच्या ओळी आहेत परंतु मानवाने वृक्ष वनसंपदा नष्ट करण्याचा सपाटा लावला असला तरीही नष्ट होत असलेल्या वृक्षसंपदेत औषधी पळस फुलांचे सौंदर्य अधिक भर टाकतांना दिसून येत आहे. शिशिर ऋतुमधे वातावरणातील गारवा लुप्त होऊन पानगळीने उघडी पडलेली वनसंपदा पळस फुलांच्या सौंदर्याने रंग उधळतांना आपल्याला दिसते. तसेच आपले लक्ष वेधत असते. कुठेही गेले तरी 'पळसाला पाने तीनच ' अशी म्हण आहे. तोच पळस बहुगुणी असून त्याच्या फुलांचा उपयोग होळीत रंग बनविण्यासाठी होतो. पानांचा उपयोग द्रोण, पत्रावळी, बिडी निर्मितीसाठी केला जातो. पळस हा खडकाळ, हलकी व मध्यम निचरा होणाऱ्या जमिनीत विशेषतः उगवतो. शेताच्या धुऱ्यावर आढळणारा पळस पानगळ वृक्ष असून झाडांची पाने गळून गेली की, मग पळसाच्या फुलांचे घड येतात. सध्या निसर्गात केशरी, भगवा, पंधरा आणि पिवळा अशा विविध रंगाची फुले आढळून येतात. बहुगुणी असलेला हा पळस काही भाग वगळता वगळता मानवाच्या अवैध वृक्षतोडीमुळे दुर्मिळ होताना दिसत असला तरीही आहे.रिसोड लोणी लोणार या राज्य मार्गावरील पडीक जमिनीवरील माळरानावर तसेच अनेक शेतकऱ्यांच्या शेताच्या बांधावर पळस चांगलाच बहरलेला दिसून येत आहे.

पळस झाडाच्या फुलांना शास्त्रामध्ये खूप महत्त्व आहे.या फुलांची पाने ही अनेक त्वचा रोगांवर प्रभावी ठरतात तसेच या झाडाची साल ही जखम भरण्यासाठी वापरली जाते.अशा अनेक उपयोगी पडणारा हा पळस वृक्ष आहे.पळसफुलांची गुच्छ पाण्यात टाकली की,पळसफुले पाण्यात भिजू घालून ठेवून त्यापासून भगवा नैसर्गिक रंग तयार होतो. पूर्वी रंगपंचमीच्या दिवशी पळस फुलांचा रंग वापरला जायचा. याच रंगाने रंगपचंमी उत्सव साजरा होत असे.परंतु आज प्रत्येकाला वेळ नाही म्हणून बाजारपेठेत उपलब्ध असलेले कृत्रिम रंग विकत घेऊन रंगपंचमी साजरी केली जाते.

# स्वाध्याय परिवाराच्या श्रमभक्तीतून 500 चेक डँम व पाझर तलावांची निर्मिती

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** 1986 ला गयाप्रयागला जागतिक तिर्थराज मिलनाचा कार्यक्रम प.पु.पांडुरंगशास्त्री आठवले दादा,यांच्या उपस्थितीत तीन दिवशीय कार्यक्रम लाखोंच्या संख्येने स्वाध्याय परिवार उपस्थित होता. त्या कार्यक्रमात स्वाध्याय परिवाराने एक प्रतिज्ञा केली होती, 'हार एक के दिमाक मे प्रभुको बिठायेंगे'. त्यानिमित्ताने दि,18 ते 20 मार्च रोजी तालुक्यातील प्रत्येक गावात भावफेरी करुन भगवंताची व पृथ्वीची कृतज्ञता व्यक्त करत चेक डँम व जलसंधारणाचे श्रमभक्तीतुन कामास सुरवात होत आहे. यानिमित्ताने स्वाध्याय परिवारातील दमंपती च्या माध्यमातून हजारो हात कृतज्ञता व्यक्त पैठण तालुक्यातील आडुळ, आंतरवाली, चिंचोली, बालानगर, थेरगाव, मुरमा, चिंचाळा या गावात जवळपास ५०० चेक डँम बांधून थेरगाव येथे निर्मलनिर उभारण्यात येणार आहे.

# साहाय्यक गटविकास अधिकारी म्हणून सुनिता वानखेडे रुजू

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** पंचायत समिती येथे सहाय्यक गटविकास अधिकारी म्हणून सुनिता वानखेडे रुजू झाल्या आहेत. सहाय्यक गटविकास अधिकारी गोपाळ पाटील कल्हारे यांच्या गटविकास अधिकारी पदोन्नतीने रिक्त झालेल्या जागेवर सहाय्यक गटविकास अधिकारी म्हणून श्रीमती सुनिता वानखेडे पंचायत समिती लोहा येथे रूजु झाल्या आहेत. जिंतूर येथे प्रभारी गटविकास अधिकारी म्हणून त्यांचा कार्यकाळ अतिशय शिस्तबद्ध व कार्यक्षम अधिकारी म्हणून काम पाहिले. त्यांची बदली लोहा येथे करण्यात आली. यामुळे त्या आज पंचायत समिती लोहार येथे रुजू झाल्या आहेत. यावेळी पंचायत समिती लोहाच्या वतीने कक्ष अधिकारी सतीश चोरमले, कार्यालयीन अधीक्षक प्रियदर्शन वाघमारे, घरकुल विभागाचे दिनेश तेलंग, भिंगोले व तसेच सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या वतीने अभिनंदन व स्वागत करण्यात आले.



# तुकाराम बीजेनिमित्त जगदगुरू संत श्री तुकाराम महाराज मंदिरामध्ये गाथा पारायण सुरू

## पाचवा वेद असलेल्या गाथा ग्रंथांचे पारायण म्हणजे तुकोबारायांची गळाभेटच : उद्धव महाराज मंडलिक



आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** तीर्थक्षेत्र नेवासा येथे असलेल्या जगदगुरू श्री संत तुकाराम महाराज मंदिरामध्ये तुकाराम बीज"उत्सवाच्या निमित्ताने गाथा पारायण सोहळयास मंदिराचे प्रमुख महंत वाणीभूषण गुरुवर्य हभप उद्धव महाराज मंडलिक नेवासेकर यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहपूर्ण वातावरणात प्रारंभ झाला. पाचवा वेद असलेल्या संत तुकोबांच्या गाथा ग्रंथांचे पारायण करणे म्हणजे तुकोबारायांची गळाभेट घेण्यासारखे आहे म्हणून जीवनात गाथा ग्रंथाचे पारायण करा असे आवाहन हभप उद्धव महाराज मंडलिक यांनी यावेळी बोलताना केले.

ब्रम्हलिन सदगुरू श्री नारायणगिरीजी महाराज व वैकुंठवाशी हभप बन्सी महाराज तांबे यांच्या कृपा आशिर्वादाने सुरू झालेल्या गाथा पारायण सोहळयाच्या प्रसंगी हभप श्री उध्दवजी महाराज मंडलिक यांच्या हस्ते संत तुकाराम महाराजांच्या मूर्तीचे पूजन व दीपप्रज्वलन करून गाथा ग्रंथांच्या पारायणाचा शुभारंभ करण्यात आला.संत तुकाराम महाराज मंदिराचे सेवेकरी व विश्वस्त भागवताचार्य हभप अंकुश महाराज जगताप यांनी उपस्थित भाविकांचे स्वागत केले.

पारायण व्यासपीठ म्हणून हभप नामदेव महाराज जाधव(शास्त्री)लक्ष्मण महाराज नांगरे हे करत असून दि.२० मार्च ते २७ मार्च या कालावधीत होत गाथा पारायण सोहळयामध्ये सकाळी ७ ते ११.३० गाथा पारायण, दुपारी ३ ते ५.३० यावेळेत भागवताचार्य हभप श्री अंकुश महाराज जगताप यांच्या सुश्राव्य वाणीतून संगीतमय श्रीमद भागवत कथा होणार आहे.

सायंकाळी ६ ते ७ हरिपाठ,तर रात्री ८ ते १० या वेळेत होणाऱ्या कीर्तन महोत्सवात गणेश महाराज तनपुरे,योगेश महाराज जाधव,भगवान महाराज मोरे (देहूकर),स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज( देवगड),गहिनीनाथ महाराज आढाव,शशिकांत महाराज भवर (शेकटा),डॉ. शुभम महाराज कांडेकर यांची कीर्तनाची कार्यक्रम होणार आहे.

बुधवार दि.२७ मार्च रोजी संत तुकोबारायांच्या सदेह वैकुंठगमन सोहळयाच्या निमित्ताने हभप श्री उद्धवजी महाराज मंडलिक यांच्या काल्याच्या किर्तनाने गाथा पारायण सोहळयाची सांगता होणार आहे.

जगदगुरू संत श्री तुकाराम महाराज यांच्या बिजेनिमित्ताने होणाऱ्या गाथा पारायण सोहळयात भाविकांनी पारायणाचा व कीर्तन श्रवणाचा लाभ घ्यावा असे आवाहन संत तुकाराम महाराज मंदिर देवस्थानचे प्रमुख महंत हभप श्री उद्धवजी महाराज मंडलिक नेवासेकर यांनी केले आहे.

# रामनवमी मिरवणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलीस स्टेशन, प्रशासनाला निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** रामनवमीच्या उत्सवाच्या निमित्ताने नेवासा शहरात रामराज्य उत्सव समितीच्या वतीने काढण्यात येणाऱ्या प्रभू रामचंद्र भगवंताच्या काढण्यात येणाऱ्या भव्य दिव्य मिरवणुकीच्या पार्श्वभूमीवर रामराज्य उत्सव समितीच्या वतीने बुधवारी दि.२० मार्च रोजी पोलीस स्टेशन व तहसीलदार व नगरपंचायत प्रशासनाला निवेदन देण्यात आले. शेकडो रामभक्तांच्या वतीने देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की दरवर्षीप्रमाणे रामराज्य उत्सव समिती नेवासा शहर च्या वतीने रामनवमी निमित्त रामनवमी शोभा यात्रेचे रामनवमीच्या एक दिवस आधी संध्याकाळी ६ ते ११ पर्यंतचे नियोजन करण्यात येते. याही वर्षी दिनांक १६ एप्रिल २०२४ मंगळवार रोजी सदरचे नियोजन रामराज्य उत्सव समितीने केलेले असुन यावर्षी संपूर्ण तालुक्यास जिल्हयातुन प्रभु श्रीरामभक्त नेवासा शहरात या शोभा यात्रेत सहभागी होण्यास येणार आहे. यावेळी सदर शोभा यात्रेत कमीत कमी ५ पध्दतीचे हालते व इतर देखावे असणार आहेत ज्यामध्ये प्रभु श्रीराम अयोध्या मंदिर, श्री ज्ञानेश्वरीचे गांव असल्याने ज्ञानेश्वर मंदिर संदर्भात, देखावा, अघोरी देखावा, अहिल्यानगर नामांतर झाल्याने त्यासंदर्भात देखावा व इतर देखावे यामध्ये असणार आहेत. तसेच येणा-या भाविकासाठी प्रसादाचे नियोजन श्री मोहिनीराज देवस्थानच्या श्री मोहिनीराज मंगल कार्यालय पाकशाळा येथे करण्यात आलेले आहे. सदर शोभा यात्रेचा पालखी मार्ग नेवासा येथील कै. जयदीप ठाणगे यांचे दुकानापासुन ते प्रभु श्रीराम मंदिर नेवासा खुर्द असा असणार आहे. त्यामुळे सदर शोभा यात्रेची प्रशासन म्हणुन आपणास माहिती देणे आवश्यक आहे म्हणून हे निवेदन देण्यात आले असल्याचे निवेदनात स्पष्ट केले आहे

मागील दोन वर्षापुर्वी शोभा यात्रेला लागलेले गालबोट लक्षात घेता योग्य तो पोलीस बंदोबस्त मिळावा अशी विनंती या निवेदनात करण्यात आली असल्याचे म्हटले आहे निवेदन देतेवेळी शेकडो रामभक्त उपस्थित होते.सदरचे निवेदन पोलीस निरीक्षक धनंजय जाधव,नगरपंचायतचे कार्यालयीन अधीक्षक रामदास म्हस्के यांना देण्यात आले.





नेवासा तालुक्यातील प्रवरासंगम येथील आगमन प्रसंगी श्री क्षेत्र देवगड संस्थानचे महंत गुरुवर्य श्री भास्करगिरीजी बाबांचे संतपूजन करताना ग्रामपंचायतचे मार्गदर्शक संदीपजी सुडके, समवेत बाळासाहेब मुरकुटे, माजी सरपंच सुनीलशेठ बाकलीवाल, पांडुरंग काळे, प्रकाश पांडव, शांतवन खंडागळे, गजानन गवारे, आनंद बाकलीवाल आदी दिसत आहे. छायाचित्र सुधीर चव्हाण नेवासा

# अमरावती जिल्ह्यात गॅस सिलिंडरचा स्फोट; घर खाक

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** मेळघाटातील धारणी शहरातील शिक्षक बँकेजवळ एका घरामध्ये वाणिज्यिक वापराच्या सिलेंडरचा स्फोट होऊन भीषण आग लागल्याने त्यांचे संपूर्ण घर जळून खाक झाले. शेजारच्या एका घराचेसुद्धा अल्प प्रमाणात नुकसान झाले. ही घटना बुधवारी सकाळी घडली. धारणी येथील सिव्हिल लाईन परिसरात राहणारे अशोक श्रीराम सोनी यांचा सराफा व्यवसाय आहे. सकाळी ९ वाजता त्यांच्या घरात असलेल्या वाणिज्यिक वापराच्या गॅस सिलेंडरचा अचानक भडका उडाला.

सिलेंडरच्या स्फोटानंतर काही क्षणात सोनी यांचे संपूर्ण घर जळून खाक झाले. यामध्ये जवळपास दहा लाख रुपयांचे नुकसान झाल्याची माहिती आहे. त्याचप्रमाणे बाजूला राहणाऱ्या श्रीकृष्ण श्रावण खंडारे यांच्या घरालासुद्धा या आगीच्या झळा लागल्याने साहित्य जळून सुमारे एक लाखांचे नुकसान झाल्याची माहिती आहे. घटनेची माहिती मिळताच मेळघाट क्षेत्राचे आमदार राजकुमार पटेल यांनी घटनास्थळी धाव घेऊन नगरपंचायतच्या अग्निशमन दलाला पाचारण केले. जवळपास दोन तासाच्या प्रयत्नानंतर आगीवर नियंत्रण मिळवण्यात आले. जिल्ह्यातील नांदगाव खंडेश्वर  शहरात बसस्थानकासमोरील बिसनसिंह गुमानसिंह राजपुरोहित यांच्या श्री बालाजी बिकानेर मिठाईवाला या दुकानाला आग लागली. ही घटना कळताच गावकरी मदतीसाठी धावून गेले. पोलिसांना ही माहिती कळताच ठाणेदार सुनील सोळंके, गणेश खंडारे व पोलिस ताफा घटनास्थळी पोहोचला. नांदगाव नगरपंचायत अग्निशमन दलाचे वाहन घटनास्थळी दाखल झाले. मदतीला धावून आलेल्या गावकऱ्यांच्या सहकार्याने आग ताबडतोब आटोक्यात आणल्याने या आगेची झळ आजूबाजूला पोहोचली नाही व अनर्थ टळला. आगीचे कारण कळू शकले नाही.

# नेवासा मेलडी मेकर्स ग्रुपचा स्नेहमेळावा सदाबहार गीते गाऊन साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** येथील सेवानिवृत्त नायब तहसीलदार चंद्रकांत कांदे यांनी स्थानिक गायक कलाकारांसाठी स्थापित  केलेल्या नेवासा मेलडी मेकर्स ग्रुपचा स्नेहमेळावा नेवासा येथील  स्थानिक गायकांनी सदाबहार गीते गाऊन साजरा केला.

नेवासा येथील औदुंबर चौकात असलेल्या हॉटेल प्रणाम च्या सभागृहात हा स्नेहमेळावा घेण्यात आला या स्नेहमेळाव्याचे उदघाटन नेवासा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक धनंजय जाधव यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी संभाजीनगर येथील उद्योजक संजय कुंडूलवाल, राजेंद्र मंडोरे,स्वप्नील चौधरी, विजय कुंडूलवाल, मुकेश बोराडे,सुवर्णकार बालेंद्र पोतदार, नेवासा होमगार्ड कमांडर पत्रकार बाळासाहेब देवखिळे, नवोदयचे माजी प्राचार्य नेवासा येथील अन्सार भाई शेख, विजय घाडगे, प्रभाकर शिंदे, ज्ञानेश्वर थोटे, रंजनदादा जाधव, संजय मिटकरे यावेळी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. यावेळी आलेल्या मान्यवर व उपस्थित स्थानिक गायक कलाकारांचे नेवासा मेलडी मेकर्स ग्रुपचे प्रमुख मार्गदर्शक सेवानिवृत्त नायब तहसीलदार चंद्रकांत कांदे यांनी स्वागत करून मेलडी मेकर्स ग्रुपच्या स्थापनेमागचा उद्देश स्पष्ट केला.तर मेलडी ग्रुपचे सदस्य नेवासा प्रेस क्लबचे कार्याध्यक्ष पत्रकार सुधीर चव्हाण यांनी प्रमुख अतिथींचा परिचय करून दिला. यावेळी स्थानिक गायक गोल्ड व्हयाल्यूअर कृष्णाजी डहाळे, वास्तू शिल्पकार राजेंद्र परदेशी, पत्रकार सुधीर चव्हाण, राजेश पिंपळे, राजू शेख, राजेश कडू, मुबारक शेख, रमेश कनगरे, कृषी मार्गदर्शक अभयकुमार मोहिते, संतोष सुपेकर, विशाल पवार, दिगंबर भोंडगे, युसूफ शेख यांनी स्व. किशोर कुमार, स्व. महंमद रफी, स्व.एस. पी. बालसुब्रमण्यम, स्व. मन्नाडे यांची गाजलेली सदाबहार गीते गाऊन उपस्थित मान्यवरांची मने जिंकली.





# नेवासा प्रेस क्लबच्या वतीने तहसीलदार, पोलीस निरीक्षकांना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** सध्या तालुक्यात वाहनांवर व ईतरत्र शासकीय कार्यालयात प्रेस नावाचा व पत्रकार पदाचा गैरवापर करणाऱ्या तोतया पत्रकारांचा मोठ्या प्रमाणावर सुळसुळाट झाला असून लोकशाहीचा आधारस्तंभ बदनाम करणाऱ्या या बोगस पत्रकारांवर कारवाई करा असे निवेदन नेवासा तहसीलदार संजय बिराजदार व नेवासा पोलीस निरीक्षक धनंजय जाधव यांना नेवासा प्रेस क्लब यांच्या वतीने बुधवारी निवेदन देण्यात आले. या निवेदनात म्हटले की, तालुक्यातील अनेक दुचाकी,चारचाकी आदि वाहनांवर "PRESS" असे लिहून पत्रकार असल्याचे भासवून प्रेस नावाचा गैरवापर करून शासकीय अधिकारी व कर्मचारी यांना तोतया पत्रकार ब्लेंकमेलिंग करत आहे.जाहिरातीच्या नावाखाली आर्थिक लूट करत आहे तसेच पोलीस ठाण्यात देखील त्यांचा वावर असतो हया गोष्टींला पायबंद घालावा जेणे करून लोकशाहीचा आधारस्तंभ बदनाम होणार नाही अशी मागणी यावेळी करण्यात आली. यावेळी नेवासा प्रेस क्लबचे अध्यक्ष मोहन गायकवाड, संस्थापक गुरूप्रसाद देशपांडे, अशोक डहाळे, कार्याध्यक्ष सुधीर चव्हाण, कैलास शिंदे, मकरंद देशपांडे, सुहास पठाडे, रमेश शिंदे, पवन गरुड, शंकर नाबदे, नानासाहेब पवार, अभिषेक गाडेकर यांच्यासह तालुक्यातील पत्रकार मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> बोगस पत्रकारितेच्या नावाखाली वाहनांवर प्रेस नाव टाकून वापर करणाऱ्या वाहनांवर तत्काळ कारवाई करणार व तोतया पत्रकारिता करणाऱ्यावंर योग्य कारवाईची मोहीम राबविण्यात येईल .
> **धनंजय जाधव-पोलीस निरीक्षक**

# कृषिकन्यांकडून करजगाव प्राथमिक शाळेला भेटवस्तू देऊन खाऊचे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** ग्रामीण कृषि जागरुकता आणि कृषि औद्योगिक कार्यानुभव कार्यक्रम अंतर्गत मुळा एज्युकेशन सोसायटीच्या कृषि महाविद्यालय सोनईच्या कृषिकन्यांनी नेवासा तालुक्यातील करजगाव येथील जिल्हा प्राथमिक शाळेला भेट देऊन शाळेला भेटवस्तु व शाळेतील मुलांना खाऊचे वाटप केले.

करजगाव जिल्हा परिषद शाळेला भेटवस्तू म्हणून भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची फोटोफ्रेम देण्यात आली. यावेळी शाळेच्या शिक्षक वर्गाने कृषीकन्यांचे आभार मानले.यावेळी झालेल्या कार्यक्रम प्रसंगी महात्मा फुले कृषि विद्यापीठ अंतर्गत सोनई येथील कृषि महाविद्यालयाच्या कृषिकन्या निकिता साबळे, प्रतिक्षा ठाणगे, प्रसन्ना पवार,विशाखा मडके, सोनाली पटेकर यांनी शाळेच्या विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप केले.

सदर कृषिकन्यांना सोनई कृषि महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. एच. जी. मोरे, उपप्राचार्य प्रा. एस. व्ही. बोरुडे, कार्यक्रम समन्वयक डॉ. ए. ए. दरंदले व कार्यक्रम अधिकारी डॉ.पी. आर. गिरी यांचे मार्गदर्शन लाभत आहे.



# कोपरगावनजीक ६२ हजारांची चोरी; गुन्हा दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**कोपरगाव :** शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील फिर्यादी हे बाहेरगावी गेले असता त्यांच्या घरावर पाळत ठेवून अज्ञात चोरट्याने घरातील सामानाची उचक पाचक करून घरातील लॉकर मधील विविध दागिन्यासंह रोख रकमेसह ६२ हजार ५०० रुपयांचा ऐवज लंपास केला आहे.त्यामुळे फिर्यादी आशाबाई भावराव गायकवाड (वय-६०) यांनी अज्ञात आरोपी विरुद्ध कोपरगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केल्याने खळबळ उडाली आहे.

कोपरगाव शहर आणि तालुक्यात दुष्काळाच्या झळा या वर्षी मोठ्या प्रमाणावर बसणार आहे.त्यामुळे चोरट्यांनी आपापले प्रताप दाखवण्यास सुरुवात केल्याचे आता उघड होऊ लागले असून अशीच एक घटना कोपरगाव शहरात दि.१४ मार्च रोजी रात्री ०७-०८ वाजेच्या सुमारास कोपरगाव बाजार तळ येथे लक्ष्मीमाता मंदिरात दान पेटी फोडून चोरी घडण्याची दुर्दैवी घटना घडली असताना आज कोपरगाव शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत जेऊर कुंभारी हद्दीत आणखी एक ६२ हजार ५०० रुपयांची चोरी उघड झाली आहे. या प्रकरणी फिर्यादी आशाबाई गायकवाड (वय-६०)यांनी आपल्या फिर्यादीत म्हटले आहे की,"आपण दि.१४ मार्च रोजी सकाळी ०९ नंतर बाहेरगावी गेले असता त्यांच्या घरावर अज्ञात चोरट्यानी पाळत ठेवली होती.व ते आपल्या घरी दि.१८ मार्च रोजी आले असता त्यांचे घराचे कुलूप तोडून घरातील सामानाची उचकपाचक करून कपाटातील लॉकर मध्ये ठेवलेले २५ हजार रुपये किमतीचे एक तोळ्याची जुनी वापरती मोहन माळ,२५ हजार रुपये किमतीचे सोन्याचे वापरते जुने मंगळसूत्र,७ हजार ५०० रुपयांची एक जुनी वापरती सोन्याची अंगठी, तसेच ०५ हजार रुपये रोख (त्यात ५०० दराच्या १० नोटा)असा सुमारे ६२ हजार ५०० रुपयांचा अवैज लंपास केला आहे.

# देशी दारू दुकानातून दहा हजार रुपयांची चोरी

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** फाटा येथील देशी दारू दुकानाच्या खिडकीचे ग्रील तोडून आत प्रवेश करुन चोरी झाल्याची घटना रविवारी रात्री घडली. याबाबत दाखल फिर्यादीवरून चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत दुकान चालक सुधीर योगेश तलवार (वय ५०) रा. नेवासा यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले की, १७  मार्च रोजी रात्री दुकान बंद करून गेल्यावर १८ मार्च रोजी सकाळी ८ वाजता दुकान उघडले असता खिडकीचे ग्रील तुटलेले दिसले. सीसीटीव्ही फुटेज बघितले असता रात्री एक ते दोनच्या दरम्यान तिघा अनोळखी तरुणांनी दुकानात प्रवेश करून चोरी केल्याचे दिसून आले.

सदर झालेल्या चोरीमध्ये चोरट्यांनी ड्रॉवरमधून एकूण दहा हजार रुपयांची रोख रक्कम चोरुन नेली अशा केलेल्या या फिर्यादीवरुन नेवासा पोलीस ठाण्यात अज्ञात चोरांविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला.

# गटविकास अधिकाऱ्यांमुळेच तालुक्यात विहीर, गायगोठे मंजूर

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपुत**

**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा परिसरात अल्पभूधारक शेतकऱ्यांना महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत यावर्षी गटविकास अधिकारी दादाराव अहिरे व त्यांचे कर्मचारी यांनी लाभार्थ्यांकडून एक रुपया न घेता वैयक्तिक सिंचन विहीर,गाय गोठा हे मंजूर करुन मोठा न्याय दिल्याचे बोलल्या जात आहे. मात्र काही शेतकऱ्यांनी अधिकारी व कर्मचारी यांच्यावर पंचवीस हजार रुपये घेतल्याचे खोटे आरोप केले असल्याची माहिती भाजपा (भटक्या विमुक्त जाती) चे तालुका अध्यक्ष प्रदीप चव्हाण यांनी बोलताना सांगितले आहे.

विशेष म्हणजे तालुक्यातील सावळदबारा ग्रापंचायतीने जे काही ठराव दिले होते त्याच ठरावातील नमुद असलेली ज्या लाभार्थ्यांची नावे होती. त्याच लाभार्थ्यांना गटविकास अधिकारी दादाराव आहिरे यांनी पैसे न घेता सिंचन विहीर व गाय गोठे मंजूर केले आहे. परंतु काही लोकांनी गटविकास अधिकारी व तेथील कर्मचारी यांची जाणीव पूर्वक बदनामी करुन त्यांनी यामध्ये मोठा आर्थिक गैरव्यवहार झाला असल्याची तक्रार देण्यात आली मात्र सदरील तक्रार हि खोटी असल्याची प्रदीप चव्हाण यांनी सांगितले आहे.

यामध्ये जे आरोप केले आहे की अधिकारी, कर्मचारी व इंजिनियर्स यांनी पैसे घेऊन विहीर व गायगोठे मंजूर केले आहे असे खोटे आरोप केले मात्र येथे तसे काहीच आढळून आले नाही. फक्त येथे दलालांचा सुळसुळाट पाहवयास मिळत असल्याचे चित्र दिसून आले आहे.

याबाबत गटविकास अधिकारी पंचायत समिती कार्यालयात महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या वैयक्तिक विहीर व गाय-गोठा या योजनेचा लाभ देताना ग्रापंचायतीने दिलेल्या ठरावा प्रमाणेच मंजूर केले आहेत. यामध्ये गटविकास अधिकारी व कर्मचारी यांनी कुठलाच बदल करुन चुकीच्या पद्धतीने काहीच केले नाही असे पण गटविकास अधिकारी आहिरे यांनी प्रसारमाध्यमां गोकुळसिंग राजपूत यांच्याशी बोलताना सांगितले.

**सावळदबारा परिसरात दलालांचा सुळसुळाट :** पंचायत समितीमध्ये महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेतील 2023 ते 2024 या काळातील वैयक्तिक सिंचन विहीर व गायगोठा योजनेचा लाभ देताना



कोणत्याही शेतकऱ्यांनी गटविकास व अधिकारी व कर्मचारी यांना पैसेच दिले नाही . आणि दिले असतील तसे पुरावे द्यावे .हे मात्र खरे आहे की, दलाल यामधे पैसे खात आहे आणि अधिका-याची चुकीच्या पद्धतीने बदनामी करत आहेत .ग्रामपंचायतीने दिलेल्या ठरावात बदल केला आहे नाही .लाभार्थ्यांकडून पैसे उकळले आहेत . काहीचे पैसे घेऊनही एक ते दोन वर्षांपासून मंजुरी मिळालेली नाही . त्यांचे पैसे परत करावेत दलालांच्या घरी लाभार्थी चकरा मारत आहेत .आणि बदनाम अधिकारी होत असल्याचे चित्र दिसून आले आहे . **प्रदीप चव्हाण, भाजपा, (भटक्या विमुक्त जाती) तालुका अध्यक्ष सोयगाव**



# जागतिक मौखिक आरोग्य दिन, सुखी शरीर ठेवण्यासाठी सुखी मुख फायदेशीर : डॉ. जुमडे

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** जागतिक मौखिक आरोग्य दिनाच्या निमित्ताने स्थानिक विवेकानंद गुरुकुंज प्राथमिक शाळा बुलढाणा येथे इंडियन डेंटल असोसिएशनच्या बुलढाणा तर्फे दंतचिकित्सा शिबिर आयोजित करण्यात आले. या शिबिरामध्ये जवळपास सातशे विद्यार्थ्यांची दातांची तपासणी व आवश्यक उपचार करण्यात आला. यावेळी दातांच्या तपासणीशिवाय विद्यार्थ्यांना मौखिक आरोग्य कसे राखावे , दैनंदिन रित्या सकाळी ब्रश कसा करावा याबद्दल सखोल मार्गदर्शन करण्यात आले . विद्यार्थ्यांमध्ये रुची वाढावी यासाठी एक कार्टून रंग भरण्यासाठी तसेच दातांच्या निगा राखण्याविषयीच्या विविध सूचना सूचनांचा एक कागद विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आला. शिबिराच्या आयोजनासाठी मुख्याध्यापक श्री गजानन इंगळे सर, शशिकांत पवार , सुनिता इंगळे, सोनाली इंगोले ,मोनिका गाढे, वैशाली एकडे व समस्त विवेकानंद गुरुकुल प्राथमिक शाळा शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले. आयडीए बुलढाणा च्या वतीने अध्यक्ष डॉक्टर शरद जुमडे ,सेक्रेटरी डॉक्टर सचिन किनगे , डॉक्टर नीता जतकर ,डॉक्टर संजय गवळी ,डॉक्टर वृषाली गवळी ,डॉ. साकेत सदावर्ते ,डॉक्टर गीतिका सदावर्ते, डॉक्टर शीतल इंगळे ,डॉक्टर रश्मी काळे ,डॉक्टर नितीन वाघ ,डॉक्टर अभिजीत जाधव यांनी विद्यार्थ्यांची तपासणी केली.

# प्रा. आठवले यांच्या स्मृतिदिनी वृक्षारोपण

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** शिक्षक नेते दिवंगत प्रा.पांडुरंग आठवले यांच्या तृतीय स्मृतिदिनानिमित्त गोगाबाबा टेकडी लगत वामनदादा कर्डक सभागृहा मागे असलेल्या महात्मा फुले कॉलनी येथील आनंद बुद्ध विहारअंतर्गतचे पदमपाणी बुद्ध विहार परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. मिलिंद आठवले यांनी दिवंगत प्रा. पांडुरंग आठवले यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकताना सांगितले की, प्रा. पांडुरंग आठवले हे एक सामाजिक व सर्वसामावेशक असे नेतृत्व होते, त्यांनी सतत आपले जीवन व कार्य हे एखाद्या झाडाप्रमाणे इतरांना सावली देण्यात आयुष्य झीजवले, प्रचंड मेहनती, गुणवंत नि सकारात्मक इच्छाशक्ती बाळगून लोकांना शिक्षणाची प्रेरणा दिली, नेहमी सगळ्यांच्या सहकार्य, मदतीचा,विकासाचा, हिताचा व उन्नतीचा विचार केला, केवळ वृक्षारोपण करून उपयोग नाही तर ते वृक्ष जगवणे व त्याचे संवर्धन करणे गरजेचे आहे,लावलेली झाडे जगवण्याची जबाबदारी यावेळी आठवले परिवाराने घेतली व नेहमीप्रमाणे यावर्षी वृक्षारोपण करण्याची परंपरा पुढे कायम राहणार असल्याची शपथ याप्रसंगी आठवले परिवाराने घेतली,असल्याचे डॉ. मिलिंद आठवले यांनी सांगितले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राजक्ता आठवले यांनी केले सूत्रसंचालन व आभार जीविका अंदुरकर यांनी केले, याकरिता प्रमित आठवले व शौर्य आठवले यांनी प्रयत्न केले.





# उल्हासनगरमधील वापरातही नसलेल्या काँक्रीट रस्त्याला तडे

आधुनिक केसरी न्यूज

**उल्हासनगर :** शहरात ठिकठिकाणी मल निस्सारण पाईप टाकणे व एम एम आर डिए च्या माध्यमातून सिमेंट काँक्रिट रस्त्याचे काम सुरू असून हे काम निकृष्ट दर्जाचे असल्याचे मनसेने भांडाफोड केला आहे. उल्हासनगरच्या व्हीटीसी ग्राउंड ते श्रीराम पेट्रोल पंपाकडे जाणाऱ्या नवीन काँक्रिट रस्त्याला तडे गेले आहेत. १५ दिवसांपूर्वी हा रस्ता एमएमआरडीएच्या माध्यमातून बनविण्यात आला. परंतु अजूनही हा रस्ता वापरात नसतानाच भलेमोठे तडे गेल्याने अत्यंत निकृष्ट दर्जाचं काम झाल्याचे उघड होत आहे. त्यामुळे येथील नागरिकांमध्ये असंतोष पसरला आहे.उल्हासनगर शहरात एमएमआरडीएच्या माध्यमातून शहरातील मुख्य ७ काँक्रीट रस्त्यांचे काम सुरू आहे. यातील श्रीराम चौक ते व्हीटीसी ग्राउंडकडे जाणाऱ्या रस्त्याला भल्यामोठ्या भेगा पडलेल्या आहेत. अत्यंत निकृष्ट दर्जाचे काम केल्याचे आरोप येथील नागरिक करत आहेत. या सर्व प्रकरणाचा पर्दाफाश मनसेचे अशोक गरड यांनी केला आहे. ह्यात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचारही होत असल्याचा आरोप अशोक गरड यांनी केला आहे. हा संपूर्ण काँक्रीट मालाची टेस्टिंग करून खुलासा झाला पाहिजे आणि दोषींव कारवाईची मागणी अशोक गरड यांनी केली आहे. उल्हासनगर शहरामध्ये श्रीराम चौकातील पेट्रोल पंप ते मानेरे गावापर्यंत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्यामार्फत रस्त्याच्या कामासाठी निधी उपलब्ध झाला होता त्या अनुषंगाने त्या रस्ताचे काम एका कंपनीमार्फत सुरू आहे. परंतु त्या कामाची क्वालिटी पाहिली असता कोणालाही शंका येईल अशा प्रकारचे काम सुरू आहे त्या कामावरती कोणत्याही प्रकारचं एमएमआरडीएच्या अधिकाऱ्यांचे नियंत्रण नाही आहे हे स्पष्ट दिसून येते. जागोजागी जो काही रस्ता बनवला आहे अक्षरशः त्याला भेगा पडल्या आहेत. कोणत्याही प्रकारची जनतेच्या सुरक्षेसाठी रोड कॉन्ट्रॅक्टर तर्फे कोणतीही काळजी घेतली जात नाही. भलते रस्त्याच्या बाजूला असणारे बॅरिगेट असो किंवा धुळीचा साम्राज्य पसरलेला असो हे जनतेला सहन करावं लागतं हेच या उल्हासनगर च दुर्भाग्य आहे. येणाऱ्या काही दिवसात या रस्त्या संदर्भात एमएमआरडीएशी पूर्ण पाठपुरावा केला जाईल व त्या कंपनी वरती कारवाई करण्याची मागणी केली जाईल.

# भयवाळ यांना कलमकार सन्मान प्रदान

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** येथील ज्येष्ठ साहित्यिक उद्धव



भयवाळ यांना २०२३ या वर्षामध्ये हिंदी साहित्य क्षेत्रात उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल बिहारच्या के. बी. रायटर्स या प्रकाशन संस्थेतर्फे "कलमकार सन्मान" प्रदान करून गौरविण्यात आले आहे.

उद्धव भयवाळ यांची मराठी साहित्यासोबतच हिंदी साहित्य लेखनातही घोडदौड चालू आहे. हिंदी भाषेतील साहित्य लेखनाबद्दल त्यांना आजपावेतो अनेक पुरस्कार मिळालेले आहेत. भयवाळ यांची मराठी भाषेमध्ये विनोदी कथासंग्रह, कवितासंग्रह, बालकविता संग्रह, बालकथा संग्रह आणि समीक्षा इत्यादी सात पुस्तके प्रकाशित आहेत. तसेच हिंदी भाषेत विनोदी कथा संग्रह, बालकथा संग्रह प्रकाशित असून दिल्लीच्या एका हिंदी प्रातिनिधिक काव्यसंग्रहाचे त्यांनी संपादन केलेले आहे. या शिवाय एकंदर चाळीसपेक्षा जास्त हिंदी आणि मराठी प्रातिनिधिक संग्रहांमध्ये त्यांच्या कथा आणि कवितांचा समावेश आहे. या सन्मानाबद्दल भयवाळ यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.



# नेवासा तालुक्यात पाट पाण्याची मागणी जोर धरू लागली...



आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** उन्हाची तीव्रता वाढल्यामुळे खूप बोअर व विहिरींची पाण्याची पातळी खाली गेली आहे पाणी पातळी खाली गेल्याने तरवडी, कुकाना, अंतरवाली, जेऊर, देवगाव, सुकळी, नांदूर, आंतरवाली, वडूले, चिलेखनवाडी, देवसडे इ. भागातील शेतकरी हवालदिल झाला आहे शेतात उभी असलेली मका गहू हरभरे हे शेवटच्या पाण्यावर आलेले पिके आहेत परंतु पाणी पातळी खोल गेल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे पाणी नसल्यामुळे शेतकऱ्यांच्या तोंडात आलेला घास जाण्याची चिन्हे दिसत आहे दीड महिन्यापूर्वी मुळा उजवा कालव्याचे आवर्तन सुटले होते हे आवर्तन सुटून देखील दीड महिन्यातच पाणी पातळी खोल गेली आहे. त्यामुळे या भागातील प्रगत बागातदार पाणी वापर संस्था कुकाना न्यामत शहावली बाबा पाणी वापर संस्था कुकाना, सावित्रीबाई फुले पाणी वापर संस्था तरवडी गणराया पाणी वापर संस्था तरवडी सावता पाणी वापर संस्था तरवडी पावन हनुमान पाणी वापर संस्था जेऊर मारुतराव घुले पाटील पाणी वापर संस्था देवगाव नाथ पाणी वापर संस्था कुकाना भाईनाथ बाबा पाणी वापर संस्था नांदूर शिकारी खंडेश्वरी पाणी वापर संस्था सुकळी इ सह परिसरातील अनेक संस्थांनी तातडीने मुळा उजव्या कालव्याचे आवर्तन तातडीने सोडण्याची मागणी जोर धरू लागली आहे गेल्या दोन वर्षापासून अतिवृष्टी गारपीट आदीमुळे शेतकऱ्यांची शेतीची पूर्ण वाट लागलेली आहे यावर्षी हातात तोंडाशी आलेले पीक पाण्याअभावी वाळत असल्याचे दिसत आहे त्यामुळे शेतकरी पूर्ण हतबल झालेला आहे वरील पाणी वापर संस्था व शेतकऱ्यांकडून तातडीने मुळा उजव्या कालव्याचे आवर्तन सोडण्याचे मागणी होत आहे.

> नेवासा तालुक्यात गहू, हरबरा, ऊस, मका, आदी पिकांना पाणी पातळी ने तळ गाठल्याने मोठे नुकसान होण्याची शक्यता आहे, आवर्तन सोडल्यास शेतकऱ्यांचे होणारे नुकसान टळू शकते या शेतकऱ्यांच्या प्रश्नावर राजकीय नेते बोलताना दिसत नाही, लोकसभा निवडणुकीच्या धामधूमीत शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे बगल दिला जात आहे, आवर्तन सोडण्यासाठी प्रयत्न होणे अपेक्षित आहे.
> **सोमनाथ कचरे, आम आदमी पार्टी कार्यकर्ते**

# रिसोड बाजार समितीत शेतकरी उपाशी, व्यापारी तुपाशी; सोई सुविधांचा अभाव

आधुनिक केसरी न्यूज



**वसंत पाटील**

**वाशिम :** कृषी उत्पन्न बाजार समिती रिसोड ही नेहमीच चर्चेचा विषय बनली असून या ठिकाणी ज्या शेतकऱ्यांच्या भरोषावर कृषी उत्पन्न बाजार समिती चालते त्याच शेतकऱ्यांसाठी कोणत्याही प्रकारच्या सुविधा नसून बाजार समिती प्रशासनाचे शेतकऱ्यांकडे नेहमीच दुर्लक्ष होते आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर बाजार समितीमध्ये सत्तांतरण झाले मात्र मुख्य कणा असलेला शेतकरी मात्र अद्यापही दुर्लक्षितच आहे. कृषी उत्पन्न बाजार समिती रिसोड येथे मोठ्या प्रमाणात वाशिम बुलढाणा,हिंगोली,परभणी आदी जिल्ह्यातील शेतमालाची मोठ्या प्रमाणात आवक होत असते. शेतकरी आपला माल विकण्यासाठी बाजार समितीमध्ये आणत असतात . शासनाने शेतमाल विकण्यासाठी मोठमोठे शेड कृषी उत्पन्न बाजार समितीला बांधून दिले परंतु या शेडमध्ये शेतमालाची विक्री करण्यासाठी शेतकऱ्यांना जागाच नाही. शेतकऱ्यांचा विक्री साठी आणलेला माल हा उन्हात ,पाण्या पावसात रस्त्यावर टाकावा लागतो. शेतकऱ्यांसाठी शासनाने बांधलेल्या शेडमध्ये व्यापाऱ्यांचा खरेदी केलेला माल सुरक्षित साठवलेला असतो. त्यामुळे नाईलाजाने शेतकऱ्यांना आपला शेतमाल रस्त्यावर विक्रीसाठी टाकावा लागतो. बऱ्याचवेळा शेतकऱ्यांचा शेतमाल हा अवेळी आलेल्या पावसाने भिजून नुकसान देखील झालेले आहे. शेतमाल रस्त्यावर टाकल्यानंतर त्याच रस्त्याने वाहनांची येजा चालू असते. तसेच मोकाट गुरे ढोरे यांच्यापासून शेतकऱ्यांना शेतमालाचे राखण करण्याकरता उन्हात बसावे लागते. या प्रकारे शेतकऱ्यांच्या समस्या कडे बाजार समिती प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे .विशेष म्हणजे बाजार समितीला सचिव नाही .सहायक सचिवाच्या देखरेखीखाली बाजार समितीचा कारभार रामभरोसे सुर असल्याचे शेतकरी वर्गातून बोलल्या जात आहे.

> कृषी उत्पन्न बाजार समितीचे प्र सचिव यांच्याशी संपर्क साधला असता मी सध्या निवडणूक कामामध्ये आहे . तसेच शेतकऱ्यासाठी बांधण्यात आलेले शेतकरी सदन हे सद्यस्थितीत वापरात नाही . शेतकऱ्यांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात येते .तसेच शेतकऱ्यांचा माल ओट्यावर टाकण्या बाबत चे सूचना तात्काळ संबंधित यंत्रणेला देण्यात येतील .तसेच इतरही सुविधा पुरवण्या बाबत निर्णय घेण्यात येईल .
> **प्र .सचिव कृषी उत्पन्न बाजार समिती रिसोड आश्रुजी कानडे**

# रुग्णवाहिका वेळेवर उपलब्ध न झाल्याने खाकी वर्दीने वाचवले तरूणाचे प्राण!

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** नगर येथील पुंजाराम जगताप यांचा काल दि 19 रोजी पारोळा रोड येथे अपघात झाला त्या ठिकाणी तात्काळ कुठलीही रुग्ण वाहिका उपलब्ध झाली नाही म्हणून नागरिकांमध्ये खूप रोष होता घटनास्थळी आनंदा धनगर हे वारंवार अर्ध्यापासून रुग्णवाहिकेसाठी 108 वर फोन केला परंतु कुठला ही प्रतिसाद मिळाला नाही रुग्णाची प्रकृती खालावत होती त्यामुळे उपस्थित व्यक्तीने नंतर 112 ला फोन केला व आजाद नगर पोलीस स्टेशन येथील पोलीस हेड कॉन्स्टेबल चंद्रकांत पाटील व पोलीस कॉन्स्टेबल संतोष घुगे हे तात्काळ घटनास्थळी दाखल झाले होऊन पोलीस वाहनात नेऊन अपघात झालेला रुग्णाला भाऊसाहेब हिरे सिविल हॉस्पिटल येथे दाखल केले व रुग्णावर तात्काळ उपचार सुरू झाला वेळेवर रुग्णवाहिका उपलब्ध झाली नाही म्हणून संतप्त नागरिकांनी त्या ठिकाणी भावना व्यक्त केल्या व पोलिसांनी देखील नाराजी व्यक्त केली.




# लोणी येथे क्रिकेट टुर्नामेंटचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील मौजे लोणी येथे आयोजित क्रिकेट टोर्लामेंट खेळात आखेर नायगांव ने ३६ रनाने बाजी मारली. दि१९ रोजी लोणी येथे आयोजित टेनिस क्रिकेट स्पर्धेत फायनल मधे नायगाव विरुद्ध कन्नड मुकाबल्यात नायगाव ने आठ ओव्हरमध्ये ११९ धावा रन केले तर कन्नडला १२०धावा घेवून फायनल विजयी करायचंय होतं मात्र त्याने सहा गडी आऊट होवून ८४ धावा केल्या यातच नायगाव ने ३६, धावाने मॅच खेळ जिंकला.नायगावच्या टीमला ३१०००/-रु बक्षिस मा आ.सतिशभाऊ चव्हाण यांच्याकडुन देण्यात आले. कन्नड तालुका क्रिकेट टीमला दुसरा बक्षिस २१०००/-रू बक्षिसं माजी महापौर सुदाम मामा सोनवणे यांच्या कडुन देण्यांत आलें.तिसरा बक्षिसं ११०००/-रु . संतोष दांडेकर उपसरपंच यांच्याकडून व बळीराम दांडेकर यांच्या कडून देण्यांत आलें. माजी सरपंच सत्तार पटेल यांच्या कडून आदर्श क्रिकेट संघ तीसगाव यांनाही बक्षीस देण्यात आले. क्रिकेट स्पर्धेसाठी मोठ्या संख्येने तरुण यूवक पदाधिकारी उपस्थित होते.

# आगाखान एजन्सी फॉर हॅबिटॅट इंडियाच्या वतीने वेरूळ येथे स्टेक होल्डर कन्सल्टेशन

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** वेरूळ येथील हॉटेल कैलास येथे आगाखान एजन्सी फॉर हॅबिटॅट इंडिया च्या मार्फत लोकांच्या सहभागामधून जलसंधारण कार्यक्रम दिनांक 19 रोजी स्टेक होल्डर कन्सल्टेशन कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून खुलताबाद तालुक्याचे नायब तहसीलदार श्री सावंत, निपॉन कंपनीचे सीनियर मॅनेजर श्री यादव, त्याचबरोबर सीनियर मॅनेजर पियुष आणि आगाखान एजन्सी चे इमर्जन्सी मॅनेजमेंट विभागाचे प्रमुख माननीय मधुकर सानप, प्रकल्प प्रमुख विश्वजीत, आदित्य रत्नप्रभापती हे कार्यक्रमासाठी उपस्थित आवर्जून होते. पहिले सत्र हे पाण्याची बचत व पाण्याचे व्यवस्थापन याबाबत पाणी फाउंडेशन चे ज्ञानेश्वरी दाते वॉटर ऑर्गनायझेशनचे गणपती त्याचबरोबर यशदाचे मास्टर ट्रेनर एमडी पंडित यांनी मार्गदर्शन केले. दुसरे सत्र मध्ये उद्योग व्यवसाय उपजीविका याबाबत मार्गदर्शन करण्यासाठी गेब्स फाऊंडेशनचे गणेश मते, भूररत्न ऑरगॅनिक प्रकल्पाचे मंगेश गोरे, यशदाच्या मास्टर ट्रेनर ज्योती पुरी यांनी या विषयावरती मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी रसूलपुरा, खिर्डी, खांडी पिंपळगाव, विरमगाव, बोडखा व तालुक्यातील सामाजिक कार्यामध्ये काम करणारे बचत गटाच्या अध्यक्ष, सरपंच, उपसरपंच व पालोट क्षेत्रावर ती काम करणाऱ्या विविध संस्था संघटना यांनी या कार्यक्रमांमध्ये सहभाग घेऊन हा कार्यक्रम यशस्वी केला. हा यशस्वी कार्यक्रम पार पाडण्यासाठी आगाखाने एजन्सी फॉर हॅबिटेक इंडियाचे प्रोग्राम मॅनेजर राजकुमार तोगरे, नम्रता सिंग, धोंडीराम पडोळ, संजय तुपे, प्रतिभा पुरी, प्रेरणा देशमुख आकाश घुले, अनिल जाधव या सर्व मंडळींना परिश्रम घेतले.



गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# भव्यदिव्य सोहळ्याचे आयोजन करूयात, परिस्थिती काही असो

## मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील ऐतिहासिक व जागतिक नामांकित वेरुळ येथील भोसले स्मारक हे आतंरराष्ट्रीय दर्जाचे करन्यासाठी सोहळा समितीच्या पाठीशी आम्ही यापुढे पूर्ण ताकदिने उभा रहानार असून पुढच्या वर्षी छत्रपतीचे वारसदार आसनार्या सर्व घरान्यातील राजे व सर्व सरादाराचे वारसदार यांना एकत्रित पणे निमंत्रित करुन जगाने कधीही न अनुभवलेल्या भव्यदिव्य सोहळयाचे आयोजन वेरुळ येथील भोसले स्मारका वरती करुयात तर परिस्थिति काहीही आली तरी मी माझ्या समाजाशी प्रामानिकच रहानार आणि पुढच्या वर्षीचा सोहळा हां आपण सेवेकरी बनुन भव्य दिव्य करू असे प्रतिपादन संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यानी वेरुळ येथे बोलताना केले सोहळा समिती अध्यक्ष राजेंद्र पवार व वेरुळ ग्रामस्थ यांच्या वतीने स्वराज्य संकल्पक शहाज़ी राजे भोसले यांच्या सर्वधर्मिय , सर्वपक्षीय द्विदिवसीय जयंतीचे आयोजन सोमवारी वेरुळ येथील भोसले स्मारक येथे करन्यात आले होते दोन दिवस चाललेल्या या सोहळयात रविवारी दीपोत्सव साज़रा करन्यात आला तर सोमवारी सरदार घराण्याचे वंशज सह मनोज जरांगे यांची भव्य मिरवणूक, अभिवादन , व्याख्यान , भाषण संपन्न झाले तर या सोहळयास विश्वातील सर्वात मोठी शिवजयंती साजरी करणारे शिवकालीन गायकवाड घराण्याचे वंशज अमित दादा गायकवाड पुणे मुंढवा, सर सेनापती हंबीरराव मोहिते घराण्याचे वंशज सरसेनापती राजेंद्र उर्फ संग्रामसिंह दादा मोहिते पाटील, सरनोबत येसाजी कंक यांचे वंशज रविंद्रजी कंक, सरदार कान्होजी जेधे यांचे वंशज सरदार युवराजजी जेधे, छत्रपती शिवरायांच्या धर्मपत्नी सकवारबाई साहेब यांचे ज्येष्ठ बंधू तसेच महाराजांचे प्रमुख अंगरक्षक कृष्णाजी उर्फ बंकी गायकवाड यांचे अकरावे वंशज सरदार संतोषराजे गायकवाड शिवनेरी जुन्नर, सरदार झुंजारराव मरळ यांचे वंशज सरदार प्रदीपदादा मरळ, सुभेदार तानाजी मालुसरे यांचे तेरावे वंशज सुभेदार कुणाल दादा मालुसरे, सुभेदार विक्रमसिंह मालुसरे, सरदार हैबराव शिळीमकर यांचे वंशज सरदार मंगेशराव शिळीमकर, सरदार गोदाजीराव जगताप यांचे वंशज मंथनराव जगताप सासवड, छत्रपती संभाजी महाराजांच्या दूध आई धाराऊ तथा शंभुराजांचे दुधभाऊ रायाजी गाडे पाटील यांचे वंशज अमित दादा गाडे पाटील, सरसेनापती नेताजी पालकर यांचे वंशज गणेशजी पालकर, वीर शिवा काशीद यांचे वंशज आनंदा काशीद, सरदार पिलाजीराव गोळे यांचे वंशज सरदार आबासाहेब गोळे, सेनापती धनाजी जाधव यांचे वंशज सेनापती समीर दादा जाधव, महाराजांचे वास्तु विशारद रायगडाचे निर्माते सरदार हिरोजी इंदलकर यांचे वंशज समीर दादा इंदलकर, सरदार मायनाक भंडारी यांचे वंशज ओमकार राजे नाईक भंडारी, श्रीमंत सुभेदार पिलाजीराव जाधवराव छत्रपती शाहू महाराज सातारा पहिल्या दर्जाचे सरदार व प्रमुख सल्लागार यांचे वंशज श्रीमंत सरदार समीर दादा जाधवराव,




श्रीमंत सचिन दादा भोसले पाटील गडदुर्ग संवर्धन ट्रस्टचे विश्वस्त स्वखर्चाने 300 पेक्षा जास्त किल्ले स्वच्छता श्रमदान राबवणारे, येसूबाई आईसाहेब यांचे वंशज श्रीमंत दीपक राजे शिर्के गडदुर्ग संवर्धन ट्रस्ट कार्याध्यक्ष, सरदार पिलाजीराव गोळे यांचे वंशज सरनोबत सुशांत गोळे वाई आदी शिवरायांच्या सरदाराची वंशज तसेच मराठा आरक्षण साठी सर्व जाती धर्मांना सोबत घेऊन मराठा आरक्षणाचा लढा लढणारे माननीय संघर्षयोद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या सह अध्यक्ष राजेंद्र पवार , स्वागताध्यक्ष माजी सरपंच प्रकाश पाटील , अनिल मिसाळ , चद्रकांत भराट, मच्छीन्द्र देवकर, संतोष माने , कृष्णा पाटील डोनगावकर , देवयानी डोनगांवकर, किरण पाटील डोनगावकर, जगन्नाथ खोसरे यांच्या सह अनेकाची उपस्थिती होती.



# चालकाचे नियंत्रण सुटले अन् बस पुलावरुन थेट पन्नास फूट खोल नदीपात्रात कोसळली

## जिंतूर येथील दुर्घटना; अपघातात 40 जखमी

आधुनिक केसरी न्यूज

**बि. डी. रामपूरकर**

**जिंतूर :** सोलापूरला जाणाऱ्या बसचा पुलावरून कोसळून भयंकर अपघात झाला आहे. ही घटना बुधवारी आज सकाळी साडेआठ वाजण्याच्या सुमारास जिंतूर शहरापासून अडीच किमी अंतरावर असलेल्या अकोली नदी पात्राच्या पूलावर घडली आहे. सुदैवाने यामध्ये कोणतीही जीवित हानी झालेली नसून बस अक्षरशः चक्काचूर झाली आहे.त्यावेळी तिथं बघ्यांची मोठी गर्दी झाली होती.

याबाबत अधिक माहिती अशी की जिंतूर आगाराची जिंतूर सोलापूर बस क्रमांक MH14-BT 2170 ही बस सकाळी सोलापूर मार्गे भरधाव वेगाने जात असताना जिंतूर शहरापासून अडीच किमी अंतरावर असलेल्या अकोली येथील वळण पुलावर बस चालक रंगनाथ शेळके यांचे बसवरील नियंत्रण सुटल्याने सदरील बस पन्नास फूट खोल असलेल्या नदीपात्रात पुलावरुन कोसळली यावेळी बसमध्ये जवळपास ४०-४५ प्रवासी प्रवास करत होते भरधाव बस कोसळल्यानंतर अपघात झाल्याचे लक्षात आले यावेळी बस चालक हा घटनास्थळावरून तातडीने फरार झाला. यावेळी जवळच असलेल्या शिवनेरी हॉटेलचे चालक, पंढरीनाथ शिंदे यांनी घटनेच्या दिशेने धाव घेऊन मदत कार्य सुरू केले. यावेळी या राष्ट्रीय महामार्गावरून जाणाऱ्या नागरिकांनी सदरील बसमधील जखमी अवस्थेतील प्रवाशांना बाहेर काढण्यासाठी मदत केली या घटनेमध्ये बसचे वाहक निलेश देशमुख यांना गंभीर दुखापत झाली. असून त्यांना तातडीने परभणी जिल्हा रुग्णालयाकडे पुढील उपचारासाठी पाठवण्यात आले तर घटनेमध्ये निलेश देशमुख (वाहक), अब्दुल अजीज अ.रजाक (वय 65) ,बकत्यार खान खदिर खान (वय 45) छाया राजेश डहाळे (वय 45)प्रियंका राजेश डहाळे (वय 19)गीता गजानन डहाळे(वय14)रा.पाथरी स.काशीद स फैजल (वय15)रा.चारठाणा, छाया राजेश डहाळे (वय 35 )रा. पाथरी,निर्मला नारायण सानप (वय 40)मंदाकिनी प्रभाकर सानप (वय 50),प्रभाकर विश्वनाथ सानप (वय 55)निलाबाई शंकरराव इप्पर,नारायण विश्वनाथ सानप (वय 60सर्व रा.बरडा, सत्यभामा संतोष मोहरे (वय 30) पूजा संतोष मोहरे वय 15, यमुना रोहिदास मस्के वय 40 रा उटी पूर्णा,मनकर्णा ज्ञानबा भराडे वय 60 वर्ष रा देवलगाव, समर्थ राजकुमार भांबळे वय 44,राजकुमार संभाजी भांबळे वय 28,पल्लवी राजकुमार भांबळे 20,विष्णू शिवाजी भांबळे वय 40,सुनीता विष्णू भांबळे वय 28,रुद्र राजकुमार भाबळे वय 35, सर्व रा भांबळे सावंगी,ज्ञानेश्वर रमेश धर्में,जगदीश रमेश धर्मे,रमेश हरिभाऊ धर्मे वय 36,सावित्रा रमेश धर्मे सर्व रा लोणी,निकिता नारायण मस्के वय 19 वर्ष,सफिया मो फुरखान वय 23,मो फुरखान मो हयात वय 25 वर्ष,शरद भाऊराव पाटील वय 50,शेख गफ्फार शेख सत्तार वय 70 , काशीबाई बन्सी रोकडे वय 76, धनश्री दत्तात्रय रोकडे वय 18 सर्व रा.जिंतूर,नितेश नागेशराव देशमुख वय 38 वर्ष रा चारठाणा ,सदाशिव यशवंत डोईफोडे वय 55 वर्ष रा हंडी,नामदेव मिराजी पुंड वय 60 रा भोगाव,संगीता शिवाजी कांगणे वय 30 रा वाघाळा, ज्ञानेश्वर इंद्रजित मोहिते वय 24 रा डोंगरकडा, हे सर्व अपघातामध्ये गंभीर जखमी झाले असून यामधील अनेकांना कायमस्वरूपी अंपगत्वाला सामोरे जावे लागणार असल्याची परिस्थिती पाहायला मिळाली या अपघातामध्ये अनेकांचे हात पाय कंबरडे अक्षरःक्षा मोडले, बसचा चुराडा झाली. यामध्ये बसचे समोरचे इंजन हे घटनास्थळापासून दहा फूट अंतरावर जाऊन निघून पडले. यामुळे अपघात किती भयंकर होते यावरून घटनेत गांभीर्यता लक्षात येते. सदर अपघाताची माहिती मिळताच जिंतूर आगारातील भगवान चीबडे, गजानन घुगे, संदीप भांबळे, पंडित भांबळे यांनी तात्काळ घटना स्थळी भेट दिली, व जखमी प्रवाशांना तात्काळ आर्थिक मदत दिली. या सर्व जखमींना जिंतूर ट्रामा केअर सेंटर येथील वैद्यकीय अधीक्षक डॉ.रविकिरण चांडगे वैद्यकीय अधिकारी डॉ. अनिल गरड डॉ.गजानन काळे यांनी प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी जिल्हा रुग्णालयाकडे पाठविले.

# राहुल लोणीकर यांना परभणी लोकसभा मतदार संघातून उमेदवारी देण्याची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**परतुर :** युवा हृदय सम्राट म्हणून तरूणा मध्ये राहुल लोणीकर यांणा परभणी लोकसभा मतदार संघातुन उमेदवारी दिल्यास विरोधकांचे डिपाजिट जप्त होईल असी परभणी लोकसभा मतदार संघामध्ये चर्चा असुण लोणीकर यांणा माणनारा मोठा वर्ग असुण सोशल मीडिया वर राहुल लोणीकर यांणा उमेदवारी मिळावी या करिता मि मतदार माझा खासदार राहुल भैय्या असी पोस्ट मोठया प्रमाणात वायरल होत असुण तरूण पिढी च्या वॉटसाप स्टेटस डिपी फेसबुक, ट्विटर टाकत आहे , राहुल लोणीकर यांचा फोटो सह विधमान आमदार बबनराव लोणीकर यांचा फोटो मोठया प्रमाणात वॉटसाप ग्रुपवर मतदारा कडुण वायरल केला जात असुण राहुल लोणीकर सारखा तरूण होतकरू खासदार परभणी लोकसभा मधुण निवडुण गेल्यास परभणी लोकसभा मतदार संघाचा काया पलट झाल्या शिवाय राहणार नाही असे मत अनेक जाणकार बोलुण दाखवत आहे, या वेळेस परभणी लोकसभा निवडनुकी मध्ये राहुल भैय्या लोणीकर यांचा नावा मुळे परभणी लोकसभा मतदार संघामध्ये मध्ये भा,ज,पा ला अनूकूल वातावरण निर्माण झाले असुण वरिष्ठ पातळीवर याचा विचार झाल्यास या वेळेस परमणी मतदार संघातुन भा ज पा चा खासदार दिल्ली ला दरबारी परभणी लोकसभा मतदार संघातील जनता राहणार राहुल भैय्या लोणीकर यांणा परभणी लोकसभा ची उमेदवारी दिल्यास परतुर मंठा घनसांवगी मतदार संघातुन दोन लाखा च्या पुढे लिड राहील, विधमान आमदार बबनराव लोणीकर हे पाणीपुरवढा मंत्री व जालना जिल्हा चे पालकमंत्री असताना त्यांनी जालना जिल्हाया सह परभणी जिल्हा मध्ये अनेक विकाश कामे केली असुण राहुल भैय्या लोणीकर यांणी युवा मोर्चा च्या माध्यमातुन अनेक तरूण वर्गाला भाजपा युवा मोर्चा शी जोडण्याचे काम केले आहे.



राहुल भैय्या लोणीकर यांणा परभणी लोकसभा मतदार संघातुन उमेदवारी देण्याची मागणी गेल्या पंचवर्षीक निवडुकी पासुण जनतेतून केली जात असुण गेल्या पंचवर्षीक निवडुकी मध्ये परभणी ची जागा युतीतून शिव सेनेला सोडन्यात आली होती परंतु या वेळेस शिव सेना का तुल्यबळ उमेदवार नसल्याने भा ज पा ने परभणी लोकसभा ची जागा आपल्या कडे घेऊण राहुल भैय्या लोणीकर सारख्या युवा योध्याला उमेदवारी दिल्यास राहुल भैय्या तीन लाखाच्या वर मताने निवडुन येतील
**सीताराम राठोड , सरपंच परतवाडी तांडा**

# सोयगाव तालुक्यात बळीराजाची क्रूर चेष्टा !

## पीक विमा कंपनीने केला घात

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**

**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा परिसरात यंदा दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे.पिक विमा खरीप हंगामातील शेतकरी विमा शेतकरी बांधवांना पावसाच्या लहरीपणामुळे सोयाबीन, कापूस व मक्का पिकांचे नुकसान सहन करावे लागले. अशा प्रकारे पिक विमा काढलेल्या शेतकऱ्यांना पिकविमा नुकसान भरपाई मधून वंचित ठेवण्यात आले आहे. मात्र विमा कंपनीने शेतकरी बांधवांचा मोठाघात केला आहे. अनेक शेतकरी पिक विमापासून वंचित राहावे लागत आहे. अनेक पिक विमाधारक शेतकरी बांधवांनी यंदा सोयाबीन, कापूस व मक्का एक रुपयात विमा सोयगाव तालुक्यात व सावळदबारा परिसरातील शेतकऱ्यांनी पस्तीस हजार हेक्टरवर विमा काढला होता. शेतकऱ्यांना म्हणून ही थट्टा विमा कंपनीकडून माजवली जात आहे.

खरीप सोयाबीन व कापूस पिकात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. संबंधित काही शेतकरी बांधव पात्र झाले आहे.तर काही शेतकरी विमा कंपनी कडून पूर्व सूचना न देता अपात्र ठरविण्यात आले आहे.शेतकऱ्यांनी खरीपाचा विमा भरुन आज महिने झाले आहे.आणि आता विमा कंपनीला जाग आली आहे की शेतकऱ्यांनी सोयाबीन व कापूस ई-पिक पाहणी केलेली नाही.पण सातबारावर बऱ्याच शेतकऱ्यांच्या सातबारावर ई-पिक पाहणीची नोंद झाली आहे तरी शुद्धा विमा कंपनीने शेतकऱ्यांना अपात्र घोषित केले आहे.अशा हा विमा कंपनीचा भोंगळ कारभार दिसून येत आहे.





# भोकर येथे उध्दव ठाकरेंनी साधला कार्यकर्त्यांशी संवाद!

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** शिवसेना पक्षप्रमुख उध्दव बाळासाहेब ठाकरे मंगळवारी (ता.१९) हिंगोलीची जन संवाद सभा आटोपून भोकर येथील तलाव रिसोड हाॅटेलमध्ये मुक्कामी थांबले होते. यावेळी स्थानिक शिवसैनिक आणि महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांशी संवाद साधला. शिवसेनेचे पक्षप्रमुख उध्दव ठाकरे दोन दिवस नांदेड/हिंगोली दौऱ्यावर जनसंवाद सभेला हजेरी लावून भोकर मंगळवारी मुक्कामी थांबले. त्याच्या समवेत संजय राऊत व विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, संपर्क प्रमुख बबन थोरात, माजी मंत्री जयप्रकाश मूंदडा, माजी आमदार नागेश पाटील आष्टीकर, जिल्हा प्रमुख बबन बारसे यांची उपस्थिती होती. येथील मूक्कामा बाबतची माहिती गोपनीय ठेवण्यात आली होती. अचानक आगमन होताच पोलीसाची धांदल उडाली होती. मंगळवारी तालुक्यातील महा विकास आघाडी व शिवसैनिका समवेत संवाद साधुन नांदेड लोकसभेत महाविकास आघाडीच्या उमेदवारांना निवडून आणा शिवसैनीक आपल्या सोबत असल्याचे सांगितले.

यावेळी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष गोविंद पाटील कोंडलवाड, जिल्हा काँग्रेस कार्याध्यक्ष बाळासाहेब पाटील रावणगावकर, माजी सभापती प्रकाश देशमुख भोसीकर, निळकंठ वर्षेवार, पर्यावरण प्रमुख शिवाजी पाटील लगळुदकर, गिरीष रावणगावकर, आदिनाथ चिंताकुंटे यानंतर भोकरच्या शिवसैनीकानी संवाद साधत फोटोशेषन केले. यावेळी जिल्हा उप-संघटक सुभाष नाईक किनीकर, माजी तालुका प्रमुख प्रदीप दौलतदार,माजी उपजिल्हा प्रमुख सतीष देशमुख. जेष्ठ शिवसैनिक साहेबराव पाटील भोंबे, रमेश महागावकर, ज्ञानेश्वर लुंगारे, चेअरमन गंगाधर महादावाड, शहर प्रमुख पांडुरंग वर्षेवार, शहर संघटक राहुल कोंडलवार, कृष्णा कोंडलवार, मुदखेड तालुका प्रमुख पिंटु पाटील वासरीकर, शिव आरोग्य सेनेचे जिल्हा संघटक सुनील जाधव, माजी उप तालुका प्रमुख मारोती पवार, साहेब वाकोडे,राजु पोगरे, माजी उपतालुकाप्रमुख सुर्यकांत पिंगलवाड, संभाजी पोगरे, दिव्यांग सेना तालुका अध्यक्ष विठ्ठल देवोड, संभाजी देशमुख, राजु मोरे, पत्रकार उत्तम कसबे, पांडुरंग कटकमवाड, विशाल बुध्देवाड, दिगाबंर बोंदीरवाड, वामन पर्वत आदीजन शिवसैनीक उपस्थित होते. यानंतर उदध ठाकरे यांचा ताफा उमरखेड येथे रवाना झाला. यावेळी अप्पर पोलीस अधीक्षक डॉ.धरणे यांच्या मार्गदर्शना खाली पोलीस निरीक्षक सुभाषचंद्र मारकड, यांनी चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता.

# अपहरणातील आरोपीचा आत्महत्येचा प्रयत्न; शिर्डीत गुन्हा दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**कोपरगाव :** तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीतील अल्पवयीन मुलींचे अपहरण करून तिचे लैंगिक शोषण केल्या प्रकरणी आरोपीस अटक करून त्याची शिर्डी पोलीस ठाण्यात चौकशी करत असताना सदर गुन्ह्याबाबत सहानुभूती मिळवून सुटका करून घेण्यासाठी आरोपीने लघु शंकेच्या निमित्ताने पोलीस ठाण्याच्या स्वच्छतागृहात जाऊन विष प्राशन करून आत्महत्या केल्या प्रकरणी आरोपी रोहित इंद्रभान खुरसणे (वय-२०) याचे विरुद्ध शिर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्याने खळबळ उडाली आहे.

राज्यातील १८ ते २५ वयोगटातील तरुणी बेपत्ता होण्याचे प्रमाण वाढले असून,याबाबत धक्कादायक आकडेवारी समोर आली आहे.कारण मार्च २०२३ महिन्यात तब्बल ०२ हजार २०० मुली बेपत्ता झाल्या असल्याची नोंद करण्यात आली आहे.म्हणजेच रोज सरासरी ७० मुली बेपत्ता होत असल्याची धक्कादायक आकडेवारी समोर येत आहे.विशेष म्हणजे बेपत्ता तरुणींमध्ये सर्वाधिक १८ ते २० या वयोगटातील मुलींचा समावेश आहे.तर जानेवारी महिन्यात १६०० आणि फेब्रुवारी महिन्यात ०१ हजार ८१० मुली बेपत्ता झाल्या असल्याची नोंद झाली आहे.बेपत्ता झालेली मुलगी जर अल्पवयीन असल्यास पोलीस अशावेळी अपहरणाची नोंद करतात.तसेच मुलगी अल्पवयीन असल्याने तिची ओळख जाहीर होणार नाही या हेतूने पोलिसांच्या संकेतस्थळावर याची स्वतंत्र नोंद केली जात नाही.परंतु सज्ञान मुलींच्या बेपत्ता झाल्याची नोंद मात्र पोलिसांच्या संकेतस्थळावर केली जाते.धक्कादायक म्हणजे अल्पवयीन मुलींना पळवून नेऊन त्यांच्यावर लैंगिक अत्याचार झालेल्या मुलींची संख्या अधिक असल्याचे देखील समोर आले आहे.अशीच एक घटना शिर्डी पोलीस ठाण्याच्या हद्दीत फेब्रुवारी महिन्यात घडली होती ती नुकतीच उघड झाल्याने शिर्डीसह कोपरगाव तालुक्यात खळबळ उडाली आहे.

सदर अल्पवयीन मुलीचा आरोपीसह शोध घेत असताना सदर आरोपी हा संगमनेर तालुक्यातील घारगाव येथे दडून बसला असल्याची गुप्त माहिती शिर्डी पोलिसांना मिळाली होती.त्यानुसार दि.०२ मार्च रोजी सदर ठिकाणी पोलीस धडकले असता त्यांना त्या ठिकाणी आरोपी व अल्पवयीन मुलगी आढळून आले होते. त्यांना ताब्यात घेऊन त्यांची चौकशी सुरु असताना त्या ठिकाणी मुलीची आई व महिला पोलीस कर्मचारी प्रमिला शहाणे या तपास करत असताना दरम्यान च्या काळात आरोपी खुरसणे यास पोलीस ठाण्याच्या अंमलदार कक्षात रात्री ९.१५ वाजता बसवले होते.त्यावेळी त्याने आपल्याला लघुशंकेसाठी जाण्याचा बहाणा करत तो स्वच्छतागृहात गेला होता.त्यावेळी त्याने पोलिसांची नजर चुकवून आपल्या खिशात एक छोटी स्पेरॉइड नावाचे नशेचे औषधांची बाटली थेट पिऊन घेतली होती.त्यामुळे तो बाहेर आला असता त्यास मळमळ व चक्कर येऊ लागले होते.ही बाब संबंधित पोलिसांच्या लक्षात आल्यावर त्यांनी तातडीने त्यास पोलीस अंमलदार रविंद्र गोंदे,बाबासाहेब ज-हाड,होमगार्ड सागर जाधव,होमगार्ड अहीरे यांचे मदतीने त्यास श्रीसाईबाबा हॉस्पीटल शिर्डी येथे औषोधपचार कामी दाखल केले होते.

दरम्यान त्याने,"आपले व सदर मुलीचे प्रेमसंबंध असून आपल्याला तिच्याशी लग्न करायचे आहे"आपल्याला जगायचे नसल्याचे सांगून शासकीय कामात अडथळा आणण्यासाठी विषारी औषध प्राशन केले व जीवन संपविण्याच्या प्रयत्न केला असल्याचे सिद्ध झाले आहे.त्यामुळे त्याचे विरुद्ध सोळा दिवसापूर्वी दाखल झालेला गुन्हा क्रं.९३/२०२४ भा.द.वि.कलम ३६३ गुन्हा दि.१९ फेब्रुवारी रोजी दाखल झालेला असताना आरोपी रोहित खुरसणे याचे विरुद्ध शिर्डी पोलीस उपनिरीक्षक दिनेश मोरे (वय-३४) यांनी आणखी एक गुन्हा दखल केला आहे.

दरम्यान शिर्डी पोलिसांनी त्यास शिर्डी येथील रुग्णालयात भरती करून त्यास प्रतिबंधक औषध देऊन त्याचा जीव वैद्यकीय अधिकाऱ्यानी वाचवला असून त्याचे शिर्डी पोलीस ठाण्यात विरुद्ध गुन्हा क्रं.१५३/२०२४ भा.द.वि.कलम ३०९ प्रमाणे दाखल केला आहे.

दरम्यान या प्रकरणी पुढील तपास शिर्डी पोलीस ठण्याचे पोलीस निरीक्षक रामकृष्ण कुंभार यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार विजय रामनाथ पवार हे करत आहेत.

# उद्धव ठाकरेंनी घेतले घृष्णेश्वराचे दर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील वेरूळ येथील जगप्रसिद्ध घृष्णेश्वर मंदिराला मा उद्धव ठाकरे शिवसेना पक्षप्रमुख यांनी भेट देत दर्शन घेतले. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी वेरूळ येथील श्री घृष्णेश्वर मंदिरास भेट देऊन दर्शन घेतले. यावेळी देवस्थान ट्रस्ट चे अध्यक्ष सुनील रामचंद्र जोशी, व कार्यकारी विश्वस्त योगेश विट खेडे यांनी ट्रस्ट च्या वतीने शाल श्रीफळ देऊन सत्कार केला. यावेळी ग्रामपंचायती च्या वतीने देखील उद्धव ठाकरे यांचे स्वागत करण्यात आले. मा.सरपंच प्रकाश पाटील, तालुका काँग्रेस चे विजय भालेराव, दिपक पाचवणे, आम आदमी पक्षाचे युवा नेते सतीश लोखंडे, संजय जोशी यांच्यासह कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.



# रामेंद्रकुमार जोशी यांची नागपूरला बदली

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** येथील राज्य वखार महामंडळाचे विभागीय



व्यवस्थापक रामेंद्रकुमार जोशी यांची नागपूरला सहआयुक्त (प्रशासन) वस्त्रोद्योग आयुक्तालय नागपूर या पदावर पदोन्नतीने बदली झाली आहे.

रामेंद्रकुमार जोशी यांनी आजपर्यंत सहाय्यक निबंधक सहकारी संस्था सटाणा जिल्हा नाशिक, चोपडा जिल्हा जळगाव पन्हाळा जिल्हा कोल्हापूर, दिंडोरी जिल्हा नाशिक ,जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था म्हणून परभणी धुळे आणि नंदुरबार ,विभागीय उपनिबंधक दुग्ध, नाशिक, प्रादेशिक उपसंचालक साखर अहमदनगर, प्राचार्य तथा संचालक राष्ट्रीय सुगीपश्चात तंत्रज्ञान संस्था तळेगाव दाभाडे जिल्हा पुणे, केंद्र शासनाच्या सेंट्रल ऑफ एक्सलन्स फॉर फ्लावर्स या कार्यक्रमांतर्गत नेदरलँड येथे एक महिन्याचे विशेष प्रशिक्षण, धुळे व नंदुरबार जिल्हा बँकेचे प्रशासक म्हणून कामकाज, अवसायनातील सूतगिरणी साखर कारखाना बँका चे अवसायक म्हणून उत्तम रित्या काम केले आहे जोशी हे शासकीय विद्यानिकेतन नाशिक धुळे येथे माजी विद्यार्थी असून त्यांच्या नागपूरला पदोन्नतीवर झालेल्या बदलीबाबत सर्वत्र अभिनंदन होत आहे लवकरच ते आपल्या पदाचा पदभार स्वीकारणार असल्याचे जोशी यांनी आधुनिक केसरी च्या प्रतिनिधींशी बोलताना सांगितले.

# विनयभंगाच्या गुन्ह्यात आरोपीस पावणे दोन वर्षे कारावास व चार हजार दंड

आधुनिक केसरी न्यूज

**राहुरी :** पोलीस स्टेशन हद्दीत 19 8 2019 रोजी बारागाव नांदूर येथे घडलेल्या विनयभंगाच्या गुन्ह्याचा (राहुरी पो.स्टे. गु.र.न.६८९/२०१९ भा.दा.वी.क.३५४,३२३,५०४,५०६,३४ ) तपास पोलीस नाईक प्रवीण खंडागळे नेमणूक राहुरी पोलीस स्टेशन यांनी केलेला होता. सदर गुन्ह्याचे दोषारोप पत्र मान्य न्यायालयात सादर केल्यानंतर राहुरी येथील मा न्यायालय क्र. १ श्रीमती ए.एस.वाडकर यांचे कोर्टात सदर गुन्ह्यातील आरोपी संदीप नवनाथ नेहरकर (तलाठी) यास मा न्यायालयाने भा.द.वी.क.३५४ खाली एक वर्ष सहा महिने साधा कारावास व दंड रु.3000/- दंड न भरल्यास एक महिना साधा कारावास तसेच भा.द.वी.क.३२३ खाली 3 महिने साधा कारावास तसेच दंड रु.१०००/- दंड न भरल्यास १५ दिवस साधा करावास. दंडाची रक्कम मुळ फिर्यादीस देण्याचा हुकूम अशी शिक्षा ठोठावली आहे. सदर गुन्ह्यात सरकार पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता श्री.आर.के.गागरे यांनी कामकाज पाहीले. सरकार पक्षाच्या वतीने पाच साक्षीदार तपासून साक्षीदारांच्या साक्षीवर तसेच सरकारी पक्षाच्या युक्तीवाद ग्राह्य धरून सदर शिक्षा सुनावण्यात आलेली आहे.राहुरी पोलीस स्टेशन च्या वतीने कोर्ट पैरवी पो.शिपाई श्री विनोद उंडे, भगवान थोरात यांनी साक्षी कामी समन्वय साधलेला आहे.

# रस्त्यावरच मृतदेहावर अंत्यसंस्कार; गावात तणाव

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** रस्त्यावरच मृतदेहावर अंत्यसंस्कार करून दहन केल्याप्रकरणी धोडप (तालुका चिखली) येथील ३५ गावकऱ्यांविरुद्ध अमडापूर पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहे. मृतदेहाची अवहेलना केल्याच्या आरोपावरून ही कारवाई करण्यात आली आहे. स्मशानभूमिकडे जाणारा रस्ता लोखंडी गेट उभारून अडविल्याने धोडप येथील श्रीराम कोल्हे यांच्या पार्थिवावर १८ मार्च रोजी संध्याकाळी नातेवाईक व गावकऱ्यांनी रस्त्यावरच अंत्यसंस्कार केले होते. प्रकरणी मृतदेहाची विटंबना करून रस्त्यावर अंत्यसंस्कार करण्यात आल्याची तक्रार शिवाजी बिलघे यांनी दिली.

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार

किराणा
सुका मेवा
मसाले
क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू
स्टीलच्या वस्तू
ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे
साफ सफाईचे सर्व साहित्य
आणि बरेच काही
सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर